cmyk

## संपादकीय

### राज्यकर्त्यांना पेशवाई माहिती आहे का?

इतिहासाचा गौरव करताना तो संपूर्ण सांगितला जातो का, की सत्तेच्या सोयीने निवडला जातो? पंतप्रधान नरेंद्र मोदी पेशवाईचा उल्लेख करताना मराठा साम्राज्याच्या पराक्रमावर भर देतात; पण त्याच काळातील सामाजिक अन्याय, जातीय जखमा आणि फुलेआंबेडकरांनी नोंदवलेले वास्तव मात्र दुर्लक्षित राहते.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२३० | गुरूवार दि.१८ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### शिंदे अमित शहांचे टेस्ट ट्यूब बेबी –खा राऊत

मुंबई : महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सांगता सभेच्या मुद्यावरून राजकीय वातावरण तापू लागले आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या गटावर जोरदार शब्दांत टीका केली. पुढे बोलताना संजय राऊत यांनी शिंदे गटाचा शिवतीर्थाशी नेमका काय संबंध आहे, असा सवाल उपस्थित केला. तुमचा पक्ष अमित शहांनी ताब्यात घेतला आहे. तुम्ही अमित शहांचे टेस्ट ट्यूब बेबी आहात, अशा शब्दांत त्यांनी एकनाथ शिंदेंवर व त्यांच्या गटावर टीका केली.शिवसेने संघर्षाचा वारसा शिवतीर्थाशी जोडलेला असून तो कोणीही हिरावून घेऊ शकत नाही, असा दावा राऊत यांनी केला.

### साताऱ्यातील ड्रग्ज प्रकरणात शिंदेंचे लागेबांधे

मुंबई : सातारा जिल्ह्यातील सावळी गावात एमडी ड्रग्जचा मोठा कारखाना मुंबई क्राईम ब्रँचने उघड केला पण फडणवीस सरकार हे प्रकरण गांभिर्याने घेत नाही. एवढा मोठा ड्रग्जचा कारखाना असल्याचे उघड झाले असताना अद्याप यामागील ख–या सुत्रधारावर कारवाई केलेली नाही. या सावळी गावाजवळच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे दरे हे गाव असून त्यांचा भाऊ प्रकाश शिंदे यांचा हा काळा धंदा सुरु होता. सावळी गावातील ड्रग्जचा कारखाना व उपमुख्यमंत्री एकनाश शिंदे यांचे लागेबांधे असल्यानेच सरकार ठोस कारवाई करत नाही, असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

### युद्धात पाकने भारताचा पराभव केला –चव्हाण

पुणे : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी भारत–पाक युद्धात भारताचा पराभव झाल्याचा दावा केल्यामुळे एकच खळबळ माजली आहे. पत्रकारांनी याविषयी चव्हाण यांना छेडले असता त्यांनी आपण आपल्या विधानावर ठाम असल्याचे सांगत माफी मागण्याचा विषयच नसल्याचे चव्हाण यांनी म्हटले आहे.पृथ्वीराज चव्हाण यांनी काल पुण्यातील पत्रकारांशी संवाद साधला होता. त्यात त्यांनी ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकने भारताचा पराभव केल्याचा धक्कादायक दावा केला होता. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकविरोधात ऑपरेशन सिंदूर राबवले होते.

### गांधींचे निकटवर्तीय आ.सातव भाजपात जाणार

हिंगोली: महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत झालेल्या मानहाणीकारक पराभवानंतर महाविकास आघाडीतील सर्वच पक्षांना गळती लागली असून काँग्रेसला सर्वाधिक धक्के बसत आहे. माजी आमदार संग्राम थोपटे, संजय जगताप, कुणाल पाटील हे भाजपवासी झाल्यानंतर आता काँग्रेसचे माजी खासदार दिवगंत राजीव सातव यांच्या पत्नी आणि काँग्रेसच्या विधानपरिषद आमदार प्रज्ञा सातव यादेखील काँग्रेसचा हात सोडण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली आहे. प्रज्ञा सातव यांचा उद्या भाजप प्रवेश होणार असल्याचंही सांगितलं जात आहे.

### शिंदेंच्या रिसॉर्टमध्ये कोट्यवधींचे अंमली पदार्थ

सातारा: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भावाच्या रिसॉर्टमध्ये अंमली पदार्थ सापडल्याचा खळबळजनक आरोप शिवसेना उबाठाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे. साताऱ्यातील सावरी गावात पोलिसांनी धाड टाकली. त्यावेळी एकनाथ शिंदे यांचे बंधू प्रकाश शिंदे यांच्या मालकीच्या रिसॉर्टमध्ये ११५ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ सापडले, असा सनसनाटी आरोप अंधारे यांनी केला. त्यावेळी त्यांनी या संदर्भातील अनेक पुरावेदेखील दाखवले.सावरी गावात असलेल्या रिसॉर्ट आणि त्या रिसॉर्टपासून काही अंतरावर असलेल्या शेडचा फोटो सुषमा अंधारे यांनी दाखवला. 'सावरी गावात रिसॉर्ट आणि शेड आहे.

### मुंबईत शरद पवारांच्या राष्ट्रवादीत संभ्रम

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस शप पक्षाने मुंबई महापालिकेत ५० जागा लढविण्याची तयारी सुरू केली आहे. पालिकेतील २२७ प्रभागांमध्ये निवडणूक लढविण्यासाठी पक्षाने इच्छुकांकडून अर्ज मागवले होते. परंतु, जेमतेम २५० कार्यकर्त्यांनीच निवडणुकीत उतरण्याची इच्छा दाखवली. त्यातही अनेकांनी दोन प्रभागांसाठी अर्ज केल्याने एकूण इच्छुकांची संख्या १००च्या आसपासच असल्याचे समजते. दरम्यान, काँग्रेसने महापालिका निवडणूक स्वतंत्र लढण्याची तयारी सुरू केल्याने काँग्रेससोबत जावे की ठाकरे बंधूंसोबत, याविषयी निर्णय झालेला नसल्याने का

# अपात्र शेतकरी कंपन्यावर सरकार मेहरबान !

## सोयाबीन मूग उडीद खरेदीची दिली खिरापत; चौकशी करण्याची मागणी

लातूर । प्रतिनिधी

**हमीभावाने शेतीमालाच्या खरेदीसाठी सोयबीन, मूग व उडीद खरेदी केंद्रे खिरापतीप्रमाणे वाटण्यात आली आहेत. निकषात न बसणाऱ्या शेतकरी उत्पादक गट (एफपीओ) व शेतकरी उत्पादक कंपन्यांना (एफपीसी) नियम बाजूला ठेवून हे केंद्र मंजूर करण्यात आली असून या प्रकरणात कृषी पणन मंडळ व नाफेडच्या अधिकाऱ्यांनी चुकीचे काम केले आहे. या प्रकाराची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई न केल्यास चुकीच्या पद्धतीने मंजूर केलेली खरेदी केंद्र बंद पाडण्याचा इशारा मनसे शेतकरी सेना तथा प्रदेश सरचिटणीस संतोष नागरगोजे यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.**

मागील हंगामात सोयाबीन खरेदी केलेल्या खरेदी केंद्रांनाच या हंगामातील खरेदीसाठी नियुक्त करावे, आदीसह खरेदी केंद्राबाबत मार्गदर्शक सूचना सरकारने निर्गमित केल्या आहेत. यात खरेदी केंद्रासाठी एफपीओ व एफपीसीची मागील तीन वर्षांत सरासरी तीन कोटींची उलाढाल बंधनकारक करण्यात



आली होती. तसेच पात्र सहकारी संस्थांनाही या खरेदी केंद्रासाठी प्राधान्य द्यावे, असे केंद्र सरकारचे आदेश आहेत. हे आदेश व मार्गदर्शक सूचना बाजूला ठेवून कृषी पणन मंडळ व नाफेडच्या अधिकाऱ्यांनी निकषात न बसणाऱ्या एफपीओ व एफपीसींना खरेदी केंद्रांचा लाभ दिला आहे. तीन कोटीच्या उलाढालीसाठी चुकीचे अहवाल तयार करण्यात आले हेत. त्याची चौकशी करून खोटी उलाढाल ▶▶ पान २ वर

# आता कोर्ट कचेरी नाही निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम

## कॅबिनेट बैठकीत सरकारचा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने राज्यातील जिल्हा परिषदेच्या निवडणुकीपूर्वी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्य मंत्रिमंडळाने आज महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १४ (२) मध्ये सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे.त्यामुळे आता उमेदवाराला निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा निर्णय अमान्य असेल तर ते न्यायालयात दाद मागू शकत होते आता तसे होणार नाही आता निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असणार आहे तर निर्णय आजच्या कॅबिनेट बैठकीत घेण्यात आला.**

राज्य मंत्रिमंडळाची आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात बैठक झाली. या बैठकीत महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १४ (२) मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. राज्यातील जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका वेळेत आणि कालबध्द रितीने व्हाव्यात या दृष्टीने हा निर्णय महत्वपूर्ण आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियमातील कलम १४ मध्ये, पोट–कलम (२) अंतर्गत उमेदवारी अर्ज (नामनिर्देशनपत्रे) स्वीकारणा–या किंवा स्वीकारण्यास नकार देणा–या निवडणूक अधिका–याच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयासमोर अपील दाखल करता येत होते. मात्र विविध जिल्हा न्यायालयांमध्ये ▶▶ पान २ वर

# वाल्मिक कराडचा जामीन उच्च न्यायालयाने फेटाळला



छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येप्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडून मोठा धक्का बसला आहे. या प्रकरणात कराडने दाखल केलेला जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला आहे.सरकार पक्ष आणि आरोपीच्या वकिलात बराच वेळ युक्तिवाद झाला ठोस पुराव्याच्या आधारे कराड याचा जमीन अर्ज फेटाळला गेला.

वाल्मिक कराडने औरंगाबाद खंडपीठात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जावर १२ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजल्यापासून ▶▶ पान २ वर

### हत्येच्या वेळी कराड दूर असल्याचा दावा

कराडच्यावतीने ज्येष्ठ विधिज्ञ शिरीष गुप्ते यांनी जोरदार युक्तीवाद केला होता. कराडला अटक करताना पोलिसांनी अटकेची कारणे लेखी स्वरूपात दिली नाहीत, त्यामुळे ही अटक बेकायदेशीर ठरते. तसेच, मकोका कायदा चुकीच्या पद्धतीने लावण्यात आला याशिवाय, संतोष देशमुख यांच्या हत्येच्या वेळी वाल्मिक कराड घटनास्थळापासून शेकडो किलोमीटर दूर असल्याचा दावा करत, त्याचा या गुन्ह्याशी कोणताही संबंध नसल्याचे सांगण्यात आले.

# एसआयटी चौकशी ! बोगस शिक्षक-कर्मचारी रडारवर

बीड/ छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

बोगस शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी भरती प्रकरणी विशेष चौकशी पथकाकडून (एसआयटी) राज्यभरातील सर्व शालार्थ आयडी प्रकरणांची चौकशी केली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शिक्षणाधिकारी कार्यालयांकडून 'शालार्थ आयडी' संचिकांचा शोध, पडताळणी सुरू आहे. उपलब्ध संचिकांचे डिजिटायझेशनही करण्यात येत आहे. त्यासाठी प्रत्येक संचिकेचे स्कॅनिंग करण्यात येत आहे. वरिष्ठ कार्यालयाकडून आठवडाभरात अहवाल सादर करण्याचे निर्देश असल्याने शिक्षणाधिकारी कार्यालयाची प्रक्रिया लगबगीने सुरू आहे. राज्यात नागपूरसह अनेक ठिकाणी अपात्र शिक्षक शिक्षकेतर ▶▶ पान २ वर

# मंत्र्यावर अटकेची टांगती तलवार

## तर कोकाटे सहा वर्ष निवडणूक लढू शकणार नाहीत

मुंबई । प्रतिनिधी

**बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिका लाटल्याप्रकरणी कोकटेंना दोन वर्षांच्या करावासाची शिक्षा देण्यात आली आहे. माणिकराव कोकाटे यांना तात्काळ रिलीफ देण्यात हायकोर्टाने नकार दिला आहे. त्यामुळे माणिकराव कोकाटे हे आता सहा वर्ष निवडणूक लढू शकत नाहीत, अशी माहिती विधिमंडळाचे माजी प्रिन्सिपल सेक्रेटरी डॉक्टर अनंत कळसे यांनी दिली. त्यांना कोर्टाने शिक्षा सुनावल्यामुळे ते तात्काळ डिस्क्वालिफाय झाले आहेत.**



सदनिका घोटाळाप्रकरणी राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात नाशिक जिल्हा न्यायालयाने अटक वॉरंट जारी केले आहे. त्यामुळे मंत्री माणिकराव कोकाटे यांना कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता आहे. नाशिक उच्च न्यायालयाने काल माणिकराव कोकाटे यांना कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवली होती. यावरुन राज्यातील वातावरण चांगलेच तापल्याचं बोललं जात आहे. ▶▶ पान २ वर

# विद्यापीठ परीक्षा; कॉपीबहाद्दर १४९ विद्यार्थ्यांवर कारवाई

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येत असलेल्या पदवी, पदव्युत्तर परीक्षेत परीक्षार्थी विद्यार्थ्यांकडे मोठ्या प्रमाणात मोबाइल आढळले. प्रशासनाच्या कारवाईत विद्यार्थ्यांकडून ५४ मोबाइल जप्त करण्यात आले, तर १४९ विद्यार्थ्यांवर कॉपीप्रकरणी कारवाई करण्यात आली आहे.

२४ विद्यापीठाच्या पदवी परीक्षा १२ नोव्हेंबर, तर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा नोव्हेंबरपासून पासून सुरू झाल्या आहेत. पदवी प्रथम सत्र परीक्षांना १५ डिसेंबरपासून सुरुवात झाली आहे. पदवी परीक्षा २३३ केंद्रांवरून सुरू आहेत. प्रथम सत्र परीक्षा होम सेंटरवर होत असून, २६८ परीक्षा केंद्रांवरून या परीक्षा सुरू आहेत. चार जिल्ह्यांतून पदवी, पदव्युत्तर पदवी अशा विविध अभ्यासक्रमांचे एकूण साडेतीन लाख विद्यार्थी सत्र परीक्षा देत आहेत. परीक्षेत गैरप्रकार रोखण्यासाठी विद्यापीठाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यात विविध जिल्ह्यांत ३२ भरारी पथके नेमली आहेत. त्यासह कुलगुरू डॉ. विजय फुलारी, परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एन. डोळे हेही परीक्षा केंद्रांना भेटी देत आहेत. नोव्हेंबर–डिसेंबर सत्र परीक्षेत कॉपीप्रकरणी १४९ जणांवर कारवाई झाली, तर ५४ जणांचे मोबाइलही ▶▶ पान २ वर

# धनंजय मुंडेंनी घेतली अमित शहांची भेट

## परळीतील जोतिर्लिंग प्रसाद योजनेत समावेश करण्याची मागणी

नवी दिल्ली । वृतसंस्था

नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांची २ वर्षांच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब केले आहे. त्यानंतर आज त्यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी झाला आहे. अटक झाल्यास मंत्रिपद जाईल. त्यामुळे त्यांचे पद कुणाकडे द्यायचे? या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे यांनी दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली अशी राजकीय गोटात चर्चा होती मात्र प्रत्यक्षात धनंजय मुंडे यांची भेट नियोजित होती आणि हि भेट परळी जोतिर्लिंग याचा केंद्राच्या प्रसाद



योजनेत व्हावा यासाठी होती अशी माहिती मुंडे यांच्या निकटवर्तीयांनी लोकतंत्रला दिली.

आज सकाळ पासून माध्यमात धनंजय मुंडे आज अचानक दिल्ली दौ–यावर गेलेत. ▶▶ पान २ वर

# भाजपाचे बीड शहराध्यक्ष अशोक लोढांना पावणे तीन कोटीचा गंडा

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

सातबाऱ्यावरप्रत्यक्षात अस्तित्वात नसलेली व पूर्वीच प्लॉटिंग करून विक्री झालेली जमीन स्वतःची भासवून तीन महिला व पाच एजंटांनी मिळून बीडचे व्यावसायिक व्यापारी तथा बीड शहर भाजपचे अध्यक्ष अशोक लोढा यांना विक्री केली. त्याला २ कोटी ८९ लाखांचा गंडा घातला या प्रकरणी सातारा पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणाची हकीकत अशी की मंजिरी अलोक चौधरी, स्वप्ना विद्याधर बडीगणवार, मोहिनी दिलबागसिंग, जावेदखान नूरखान पठाण, मैत्रेय प्लॉटिंग सेंटरचा भागीदार सुरेश सीताराम इंगळे, बद्रिनारायण नागोराव करे, साहेबराव कचरू घुगे व बाबूराव आनंद ताठे अशी आरोपींची नावे आहेत. मूळ बीडचे असलेले अशोक चांदमल लोढा है जमीन खरेदी–विक्री व्यावसायिक आहेत. २०२३ मध्ये लोढा व त्यांचे भागीदार सय्यद नजीर सय्यद वजीर (रा. बीड) हे शहरात जमिनीच्या शोधात होते. एजंट शेख रईस शेख रसूल (रा. सातारा गाव) यांच्यामार्फत त्यांना सातारा परिसरातील गट क्रमांक २० मधील १०३.५५ आर जमीन विक्री असल्याचे कळाले. त्यानंतर रईसने अन्य ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१७ डिसेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: २४.०० क्विंटल** | | |
| २,४७३ | २,९५२ | २,७२० |
| **ज्वारी/हायब्रिड: ३६.५० क्विंटल** | | |
| २,२०० | ३,४०० | २,९४९ |
| **मका/लोकल: ७.०० क्विंटल** | | |
| १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| **तूर : ६.५० क्विंटल** | | |
| ६,०५० | ६,५०० | ६,२१६ |
| **उडीद :१.५० क्विंटल** | | |
| ४,४०१ | ४,४०१ | ४,४०१ |
| **बाजरी: ४२.५० क्विंटल** | | |
| २,७०१ | ३,२६९ | २,९४४ |
| **मुग: ०.५० क्विंटल** | | |
| ५,८०० | ५,८०० | ५,८०० |
| **सोयाबीन: १६५.०० क्विंटल** | | |
| ४,१०० | ४,४७५ | ४,३५३ |
| **हरभरा: १.०० क्विंटल** | | |
| ४,१०० | ६,००१ | ५,०५० |

# 25 लाख मिळवा सायबर चोरट्यांकडून प्रेग्नन्सी फ्रॉड

पुणे । प्रांतिनिधी

**आई होण्यासाठी मला मदत करा आणि २५ लाख रुपये मिळवा, असे मेसेज पाठवून सायबर चोरट्यांकडून प्रेग्नन्सी फ्रॉड केला जातोय. या जाळ्यात छत्रपती संभाजीनगरमधील अनेक तरुण अडकले असून यांची लाखो रुपयांची फसवणूक झाली आहे. गेल्या काही दिवसांमध्ये ६ प्रकार उघडकीस आले आहेत. तुम्हालाही असे मेसेज येत असतील तर आताच सावध व्हा.**

मी आई व्हावं यासाठी तुमची मदत हवी आहे, जर तुमच्याकडून मी आई झाले तर तुम्हाला २५ लाख रुपये देईन, असा मोबाईल आणि सोशल मीडियावर मेसेज पाठवून अनेक



तरुणांना लुटल्याचे समोर आलंय. भावनिक, शारीरिक संबंध आणि पैशाचे आमिष याला वेगवेगळ्या क्षेत्रातील तरुण बळी पडले आहेत. नोकरदार, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारी मुले अशा फसव्या जाहिरातीला बळी पडत आहेत. छत्रपती संभाजी नगरात गेल्या काही दिवसांमध्ये ६ प्रकार उघडकीस आले आहेत.तरुणांना ▶▶ पान २ वर

### कशी केली जातेय फसवणूक ?

सर्वप्रथम व्यक्तीची फेसबुक प्रोफाइल तपासली जाते. त्यावरून तुमच्या जवळचे नातेवाईक, सहकारी शोधले जातात. यांच्या फोटोचे स्क्रीनशॉट आणि रेकॉर्डिंग केलेला व्हिडिओ व्हॉट्सॲपवर पाठवला जातो आणि व्हायरल करण्याची धमकी दिली जाते. पैसे दिले नाही तर तुमच्या सहकाऱ्याला किंवा मित्राला हा व्हिडिओ पाठवला जातो. त्याचे स्क्रीनशॉट पुन्हा व्हॉट्सॲपवर पाठवतात. या टप्प्यावर समाजात आपली बदनामी होईल या भीतीने फसलेला तरुण पैसे देण्यास भाग पडतो आणि येथून पैसे उकळण्यास सुरुवात होते.

### करारपत्राच्या नावाने फसवणूक ?

पुरुष गळाला लागला की सर्वप्रथम कॉन्ट्रॅक्ट तयार करायचे आहे, असे सांगून रजिस्ट्रेशन फी / करारपत्राचे शुल्क मागतात. मेल आयडी व्हीआयपी डेटाबेसमध्ये टाकावी लागेल, असा बहाणा करून ओळख व्हेरिफिकेशन फी घेतली जाते. कर भरावा लागेल, तेव्हाच पेमेंट रिलीज होईल, असे सांगत जीएसटी/प्रोसेसिंग चार्ज सुरक्षिततेसाठी हमी रक्कम आवश्यक असल्याचे सांगून सिक्युरिटी डिपॉझिटही घेतले जाते. शेवटच्या टप्प्यात कायदेशीर लीगल टीम आणि वकिलांचे शुल्क मागितले जाते.

cmyk

## अग्रलेख

# राज्यकर्त्यांना पेशवाई माहिती आहे का?

इतिहासाचा गौरव करताना तो संपूर्ण सांगितला जातो का, की सत्तेच्या सोयीने निवडला जातो? पंतप्रधान नरेंद्र मोदी पेशवाईचा उल्लेख करताना मराठा साम्राज्याच्या पराक्रमावर भर देतात; पण त्याच काळातील सामाजिक अन्याय, जातीय जखमा आणि फुलेआंबेडकरांनी नोंदवलेले वास्तव मात्र दुर्लक्षित राहते. त्यामुळे प्रश्न उभा राहतो मोदींना पेशवाईचा इतिहास माहिती आहे का, की तो केवळ राजकीय भाषणापुरताच मर्यादित आहे?

इतिहास हा केवळ गौरवगाथा नसतो, तर तो समाजाच्या स्मृतीचा आरसा असतो. सत्ताधाऱ्यांनी इतिहासाचा आधार घेताना तो संपूर्ण, प्रामाणिक आणि संदर्भासह मांडणे अपेक्षित असते. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे वक्तव्य, भाषणे आणि ऐतिहासिक उल्लेख पाहता एक प्रश्न वारंवार उपस्थित होतो मोदींना पेशवाईची नेमकी माहिती आहे का, की केवळ निवडक गौरवापुरतीच ती मर्यादित आहे? पेशवाई म्हणजे मराठा साम्राज्याचा सुवर्णकाळ, असे सरधोपट चित्र रंगवले जाते. पेशवे बाजीराव, नानासाहेब पेशवे, माधवराव पेशवे यांच्या लष्करी आणि प्रशासकीय कामगिरीने मराठा सत्ता दिल्लीपर्यंत पोहोचली, हे निर्विवाद सत्य आहे. पण याच पेशवाईच्या काळात सामाजिक विषमता, जातीय अन्याय आणि ब्राह्मणी वर्चस्वाचे टोकाचे स्वरूपही दिसते, हेही तितकेच ऐतिहासिक वास्तव आहे. इतिहासकार महात्मा जोतीराव फुले यांनी 'गुलामगिरी' आणि 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथांत पेशवाईवर अत्यंत कठोर शब्दांत टीका केली आहे. फुले लिहितात की, ''पेशव्यांच्या राजवटीत बहुजन समाज हा माणूस म्हणून नव्हे, तर गुलाम म्हणून जगत होता.'' शूद्र-अतिशूद्रांना शिक्षणाचा अधिकार नव्हता, सार्वजनिक विहिरींवर बंदी होती, सावली पडली तरी शिक्षा केली जात होती, हे उल्लेख केवळ आरोप नव्हेत, तर त्या काळातील सामाजिक रचनेचे दस्तऐवजीकरण आहे. ब्रिटिश अधिकारी माउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनीही आपल्या ' ' मध्ये पेशवाईतील जातीय अन्यायांचा उल्लेख केला आहे. जेम्स ग्रँट डफ या इतिहासकाराने मराठा सत्तेचे वर्णन करताना, लष्करी पराक्रमासोबतच अंतर्गत सामाजिक अन्याय आणि भ्रष्ट कारभारावर भाष्य केले आहे. म्हणजेच, पेशवाईवर टीका ही केवळ फुलेंपुरती मर्यादित नव्हती, तर समकालीन आणि परकीय इतिहासकारांनीही ती नोंदवली आहे. पंतप्रधान मोदी अनेकदा प्राचीन भारत, परंपरा आणि हिंदू संस्कृतीचा गौरव करतात. परंतु पेशवाईचा उल्लेख करताना जर केवळ शौर्य, मंदिरं आणि राजसत्ता यांचाच संदर्भ दिला, आणि त्याच काळातील सामाजिक अन्यायांवर मौन बाळगले, तर तो इतिहासाचा अपुराच आणि राजकीय सोयीचा वापर ठरतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ' ' आणि ' ?' या ग्रंथांत पेशवाईसह संपूर्ण हिंदू सामाजिक व्यवस्थेवर मूलगामी प्रश्न उपस्थित केले. आंबेडकर स्पष्टपणे लिहितात की, पेशवाई हा काळ बहुजन समाजासाठी गुलामगिरीचा काळ होता. हा विचार केवळ ऐतिहासिक नव्हे, तर सामाजिक मुक्तीचा पाया ठरलेला आहे. आज मोदी सरकार सामाजिक समरसतेची भाषा करते. 'सबका साथ, सबका विकास'चा नारा दिला जातो. पण इतिहासाचा एक भाग उचलून दुसरा भाग पुसून टाकणे हे समरसतेला पूरक ठरत नाही. उलट, ते जुन्या जखमांवर मीठ चोळण्यासारखे ठरते. इतिहास समजून घेणे म्हणजे त्यातील चुकांनाही मान्य करणे. पेशवाईचा गौरव करताना जर फुले-आंबेडकरांची टीका नाकारली, तर तो केवळ राजकीय प्रचार ठरतो. पंतप्रधानपदावर असलेल्या व्यक्तीकडून अपेक्षा एवढीच की, त्यांनी इतिहासाकडे भक्तिभावाने नव्हे, तर समजून घेण्याच्या प्रगल्भ दृष्टीने पाहावे. मोदींना पेशवाई माहिती आहे का? हा प्रश्न केवळ ज्ञानाचा नाही, तर दृष्टिकोनाचा आहे. कारण इतिहासाचा अपूर्ण संदर्भ हा भविष्यासाठी धोकादायक ठरू शकतो.

---

## आरोग्य सेवेत देखील आता 'एआय' तंत्रज्ञान-मुख्यमंत्री

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम, वेगवान आणि लोकाभिमुख करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय ) तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.त्यामुळे आता आरोग्य सेवेत देखील एआय तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असून हा योग्य पद्धतीने करण्याच्या सूचना आज झालेल्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी दिल्या.**

'वर्षा' शासकीय निवासस्थानी पार पडलेल्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.बैठकीत 'समग्र' संस्थेच्या वतीने सार्वजनिक आरोग्य सेवा बळकटीकरणाबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले. यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास आरोग्य सेवांची गुणवत्ता वाढेल, उपचार अधिक अचूक व वेळेत मिळतील आणि ग्रामीण तसेच दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत आरोग्य सुविधा प्रभावीपणे पोहोचवता येतील. आजच्या डिजिटल युगात आरोग्य व्यवस्थेचे डिजिटायझेशन आणि एआय आधारित उपाययोजना अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.आरोग्य संस्थांचे स्टार रेटिंग, आरोग्य सेवांचा समीक्षा अहवाल, आरोग्य हेल्पलाईन, आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, तसेच सेवा गुणवत्तेचे नियमित रिव्ह्यू यांसारख्या उपक्रमांचा समावेश होता. या उपक्रमांमुळे नागरिकांचा आरोग्य सेवांवरील विश्वास अधिक दृढ होईल, असे श्री.फडणवीस यांनी नमूद केले.बैठकीदरम्यान 'आपले गाव, आरोग्य संपन्न गाव' योजना, पॉलिएटिव्ह केअर, सिकलसेल आजारावरील उपचार, वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरती प्रक्रिया सुलभ करणे, वैद्यकीय अधिकाऱ्यांचे मानधन वाढवणे, तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमित समावेशन जलद गतीने करणे याबाबत मागण्या मांडण्यात आल्या. राज्यातील आरोग्य सेवा अधिक मजबूत करण्यासाठी शासनाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य दिले जाईल, अशी ग्वाही दिली. आरोग्य क्षेत्रातील मनुष्यबळ, पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञान यांचा समन्वय साधून दीर्घकालीन सुधारणा करण्यावर शासनाचा भर राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.या बैठकीस सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव ई. रवींद्रन, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, मुख्यमंत्री यांचे सचिव श्रीकर परदेशी, आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, समग्र संस्थेचे प्रतिनिधी गौरव गोयल तसेच सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## मानसिक आरोग्यासाठी पुस्तक वाचन- डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**



**वाचनामुळे मन शांत राहतं : पुस्तक वाचल्यास मन शांत होतं आणि तणाव कमी होतो. कथा, कादंबरी किंवा प्रेरक लेख वाचल्यास मनाला आनंद मिळतो आणि नकारात्मक विचारांपासून सुटका मिळते.**

मेंदू सक्रिय राहतो आणि विचारशक्ती वाढते वाचन केल्याने मेंदू अधिक सजग राहतो. कल्पनाशक्ती वाढते, विचार अधिक स्पष्ट होतात आणि समस्या सोडवण्याची क्षमता सुधारते. रोज काही मिनिटं वाचन केल्यास निर्णय घेण्याची क्षमता अधिक तीक्ष्ण होते. भावनिक समज आणि नातेसंबंध सुधारतात वाचनामुळे भावनिक समज वाढते. इतरांच्या भावना आणि परिस्थिती समजून घेण्याची क्षमता विकसित होते, ज्यामुळे सामाजिक आणि वैयक्तिक नातेसंबंध अधिक सुसंगत राहतात. झोपेची गुणवत्ता सुधारते : झोपण्यापूर्वी वाचल्यास मन शांत होतं आणि दिवसभरचे ताण हलके होतात. यामुळे झोपेची गुणवत्ता सुधारते आणि मन अधिक ताजेतवाने राहते. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

## युनिक क्युरियस किड्स शाळेचा क्रीडा महोत्सव जल्लोषात संपन्न

### डिजिटल युगात मैदानी खेळ पालक वर्गातुन शाळेचा कौतुक

**परळी । प्रतिनिधि**

**अल्प काळात लोकप्रिय असलेली युनिक क्युरियस किड्स शाळेत दिनांक १५ व १६ डिसेंबर रोजी दोन दिवसीय भव्य क्रीडा महोत्सव उत्साहात पार पडला. या क्रीडा महोत्सवाला प्रमुख पाहुणे म्हणून परळी येथील मा. अमोल शिंगणे सर तसेच मा. सौ.वर्षा जोशी ताई उपस्थित होते.**

या वेळी कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व टॉर्च रिलेने करण्यात आली. त्यानंतर प्रत्येक वर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या शिक्षकांसह, रंगीबेरंगी कॅप परिधान केलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध व आकर्षक मार्च पास (मॉक ड्रिल) सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. क्रीडा दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या मैदानी खेळांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने या खेळांमध्ये सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी करत विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केले व पारितोषिके पटकावली. आजच्या डिजिटल युगात मैदानी खेळांचे महत्त्व अधिक वाढले असून, खेळांमुळे शारीरिक तंदुरुस्ती, संघ भावना, शिस्त, आत्मविश्वास व सकारात्मक स्पर्धात्मक वृत्ती विकसित होते, हा महत्त्वाचा संदेश या क्रीडा महोत्सवातून देण्यात आला. दरम्यान यावेळी पालकांसाठीही विशेष खेळांचे आयोजन ही करण्यात आले होते. पालकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रमाचा मनस्वी आनंद घेतला, त्यामुळे संपूर्ण वातावरण आनंद व उत्साहाने भारावून गेले. या क्रीडा महोत्सवाचे सूत्र संचालन सचिन सारडा यांची कन्या पंखुडी सारडा हिने अतिशय उत्कृष्ट पद्धतीने केले. तिने कार्यक्रमादरम्यान सर्वांशी प्रभावी संवाद साधत विद्यार्थ्यांपासून पालकांपर्यंत सर्वांना कार्यक्रमात सक्रियपणे गुंतवून ठेवले. या संपूर्ण क्रीडा महोत्सवाचे सुयोग्य नियोजन संचालिका सौ. पूजा सरडा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. तसेच युनिक क्युरियस किड्स शाळेच्या संपूर्ण टीमने परिश्रमपूर्वक हा क्रीडा दिन यशस्वीपणे पार पाडला.या कार्यक्रमाने पालक वृंदात शाळेतील व्यवस्था व मैदानी कार्यक्रमामुळे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

## सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांची मराठी पत्रकार परिषदेच्या वैद्यकीय कक्षाचे राज्य उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती

### डॉ.राजेश इंगोले यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांची अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने वैद्यकीय कक्षाचे राज्य उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदरील नियुक्तीचे पत्र त्यांना नुकत्याच देवडी या ठिकाणी संपन्न झालेल्या पुरस्कार वितरण व पत्रकारांच्या गुणगौरव सोहळ्यानिमित्य आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सुपूर्त करण्यात आले. या निवडी बद्दल डॉ.इंगोले यांचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे.**



डॉ.राजेश इंगोले हे मागील अनेक वर्षांपासून इंडियन मेडिकल असोसिएशन या राज्यस्तरीय वैद्यकीय संघटनेचे क्रियाशील राज्य पदाधिकारी, सांस्कृतिक समिती राज्याध्यक्ष तसेच स्थानिक शाखेचे सात वर्षे अध्यक्ष होते. या संघटनेच्या माध्यमातून त्यांचा राज्यभर संपर्क निर्माण झालेला आहे आणि त्यामुळेच मागील अनेक वर्षापासून त्यांचा केवळ वैद्यकीय क्षेत्रातच नव्हे तर राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, धार्मिक सामाजिक क्षेत्रात सतत सहभाग असतो. याच सामाजिक कार्यामुळे त्यांची मागील पाच वर्षांपूर्वी अखिल भारतीय मराठी परिषदेशी नाळ जुळली आणि मराठी पत्रकार परिषदेच्या अंबाजोगाई शाखेचे वैद्यकीय कक्ष प्रमुख म्हणून ते अंबाजोगाई तालुक्यातील पत्रकारांच्या आरोग्याची काळजी सातत्याने घेत आहेत. मागील पाच वर्षांपासून अंबाजोगाईतील पत्रकारांसाठी सातत्याने आरोग्य शिबीरे भरवत असतात तसेच वेळोवेळी पत्रकार बांधवांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करीत असतात. वैद्यकीय कक्ष प्रमुख म्हणून मराठी पत्रकार परिषदेच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य तपासणी शिबिरात डॉ.राजेश इंगोले यांची महत्त्वाची भूमिका सातत्याने राहिलेली आहे. या शिबिराच्या माध्यमातून अनेक पत्रकारांच्या आजारांचे योग्य निदान लागल्यामुळे या आजारा संदर्भात काळजी घेण्यासाठी डॉ.इंगोले हे सातत्याने मोफत सल्ला देत असतात. डॉ.इंगोले यांच्या कार्याचे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी कौतुक केलेले असून डॉ.राजेश इंगोले यांनी मराठी पत्रकार परिषदेसाठी राज्यभर काम करावे, विविध उपक्रम राबवावेत असा त्यांचा वारंवार आग्रह होता आणि त्यामुळेच नुकत्याच धारूर तालुक्यातील देवडी या ठिकाणी झालेल्या पुरस्कार वितरण व पत्रकारांच्या गुणगौरव सोहळ्यात डॉ.राजेश इंगोले यांची अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वैद्यकीय कक्षाचे राज्य उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री वैद्यकीय कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे, पद्मश्री पोपटराव पवार, एस.एम.देशमुख (मुख्य विश्वस्त), मिलिंद अष्टीवकर (अध्यक्ष, अ.भा.म.प.), दिलीप सपाटे (अध्यक्ष, मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघ) यांच्या हस्ते डॉ.राजेश इंगोले यांना हे नियुक्तीपत्र देऊन त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. डॉ.राजेश इंगोले यांच्या निवडीचे समाजातील सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

## बाळराजे पवारांना जामीन मंजूर

### पवारांच्या समर्थकांनी न्यायालयाचे मानले आभार

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी दोन गटात झालेल्या राडा प्रकरणात गेवराई न्यायालयाने बुधवार ता. १७ डिसेंबर रोजी दु. ३ वाजता भारतीय जनता पक्षाचे युवा नेते बाळराजे पवार यांना जामीन मंजूर केला आहे. सोमवार ता. १५ रोजी रात्री गेवराई पोलीसांनी त्यांना अटक केली होती. एक दिवसाच्या पोलीस कोठडी देण्यात आल्यानंतर, बुधवारी पवार यांना गेवराई न्यायालयात हजर करण्यात आले. दोन्ही बाजुच्या वतीने युक्तिवाद ऐकल्यानंतर मा. न्यायालयाने पवारांना जामीन मंजूर केला. बाळराजे पवार यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ विवेकानंद सानप, ॲड. अमोल दाभाडे ,ॲड. जैस्वाल यांनी जोरदार बाजू मांडली. ज्येष्ठ विधिज्ञ कोल्हे यांनी फिर्यादीची बाजू मांडून जामीन देऊ नये म्हणून मा. कोर्टाकडे मागणी केली. दरम्यान, गेवराई न्यायालयाने बाळराजे पवार यांच्यासह चौघांनाही जामीन मंजूर केल्याचे वृत्त बाहेर येताच पवार यांच्या समर्थकांसह, हितचिंतकांनी आनंद व्यक्त करून मा. न्यायालयाचे आभार मानले आहेत. पवारांच्या वाड्यावर कार्यकर्त्यांनी तोबा गर्दी केल्याचे चित्र दिसून आले.



गेवराई नगर परिषदेच्या निवडणूकीसाठी दि. २ डिसेंबर रोजी मतदान सुरू असताना प्रभाग क्रमांक १० मधिल उर्दूशाळेतील बूथवर बीडचे पंडित पवार यांचे युवराज एकमेकांना भिडले होते. त्यानंतर माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या कृष्णाई संपर्क कार्यालयात स्वीय सहाय्यक सहाय्यक अमृत डावकर यांना मारहाण झाली होती. त्यानंतर बाळराजे पवार यांच्या निवासस्थानावर दगडफेक करून, चार चाकी गाडी फोडली होती. या मध्ये चार ते पाच लोकांना गंभीर इजा झाली होती. पोलीसांनी दोन्ही गटातील लोकांवर गुन्हे दाखल केले होते. या गुन्ह्यात अतिरिक्त कलम वाढविले असल्याने गेवराई पोलिसांनी बाळराजे पवार यांच्यासह चौघांना रात्री उशीरा अटक केली. दरम्यान, मंगळवार ता. १६ रोजी पोलीसांनी बाळराजे पवार व इतरांना गेवराई न्यायलयात हजर केले असता, मा. न्यायालयाने एक दिवसाची पोलीस कोठडी दिली आहे. या प्रकरणात गेवराई पोलिसांनी फिर्याद दाखल करून, गूरनं ७७१/२०२५ गुन्ह्यात ३३३ हे अतिरिक्त कलम वाढविले आहे. त्यामुळे, बाळराजे पवार यांच्यासह चौघांना गेवराई पोलिसांनी सोमवारी अटक केली होती. बाळराजे पवार यांना अटक करण्यात आल्यानंतर गेवराई शहरात भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी, हितचिंतकांनी पोलीस ठाण्यात व न्यायालयात गर्दी केली होती. दरम्यान, गेवराई नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी दोन गटात झालेल्या राडा प्रकरणात गेवराई न्यायालयाने, दोन्ही गटाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर बुधवार ता. १७ डिसेंबर रोजी दु. ३ वाजता भारतीय जनता पक्षाचे युवा नेते बाळराजे पवार यांना जामीन मंजूर केला आहे. बाळराजे पवार यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ विवेकानंद सानप, ॲड. अमोल दाभाडे ,ॲड. जैस्वाल यांनी जोरदार बाजू मांडली. ज्येष्ठ विधिज्ञ कोल्हे यांनी फिर्यादीची बाजू मांडून जामीन देऊ नये म्हणून मा. कोर्टाकडे मागणी केल्याचे सांगण्याताले. दरम्यान, गेवराई न्यायालयाने बाळराजे पवार यांच्यासह चौघांनाही जामीन मंजूर केल्याचे वृत्त बाहेर येताच पवार यांच्या समर्थकांसह, हितचिंतकांनी आनंद व्यक्त करून मा. न्यायालयाचे आभार मानले आहेत. माजी आमदार लक्ष्मण पवारांच्या वाड्यावर ही कार्यकर्त्यांनी तोबा गर्दी केल्याचे चित्र दिसून आले. जामीन मंजूर करण्यात आल्यावर, बाळराजे पवार कोर्टातून बाहेर पडत असताना, कोर्टाच्या पोर्चमध्ये ज्येष्ठ, कनिष्ठ विधिज्ञ उपस्थित होते. त्यावेळी पवार यांनी उपस्थित असलेल्या सर्व वकीलांना दोन्ही हात जोडून नमस्कार केला.

## पान १ वरून...

### अपात्र शेतकरी कंपन्यावर

दाखवणाऱ्या कंपन्या व गटांविरुद्ध कारवाई करण्याकडेही दुर्लक्ष केले आहे. या सर्व प्रकाराची चौकशी करून निकषात न बसलेल्या शेतकरी गट व कंपन्यांना मंजूर केलेल्या खरेदी केंद्रांची मान्यता रद्द करावी, अशा केंद्राचे प्रस्ताव पाठवणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी श्री. नागरगोजे यांनी केली आहे. तसे निवेदनही त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व संबंधितांना दिले आहे. कारवाई न झाल्यास चुकीच्या पद्धतीने मंजूर केलेली खरेदी केंद्र बंद पाडण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.उलाढालीच्या एका टक्का सेस पणन मंडळाकडे भरणे गरजेचे असतानाही त्याची खात्री केलेली नाही. मागील वर्षात सोयाबीन खरेदी केलेल्या केंद्रांना प्राधान्य देण्याची गरज असताना त्यांना हेतुपुरस्सर बाजूला ठेऊन खरेदीचा कसलाही अनुभव नसलेल्या अनेक कंपन्यांना खरेदी केंद्र मंजूर करण्यात आले आहेत.

---------------

### वाल्मिक कराडचा जामीन

सायंकाळी ६ वाजेपर्यंत सविस्तर सुनावणी झाली. मात्र, सरकारी पक्षाचा युक्तीवाद त्या दिवशी पूर्ण होऊ शकला नव्हता. त्यामुळे न्यायालयाने पुढील सुनावणी १६ डिसेंबर रोजी ठेवली होती. त्यानंतर आज अंतिम निर्णय देत न्यायालयाने कराडचा जामीन अर्ज नामंजूर केला. ही सुनावणी न्यायमूर्ती सुशिल एम. घोडेस्वार यांच्या न्यायालयात पार पडली. संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी केज पोलिस ठाण्यात वाल्मिक कराड आणि त्याच्या साथीदारांविरोधात खून तसेच मकोका कायद्याअंतर्गत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ३१ डिसेंबर २०२४ पासून वाल्मिक कराड कोठडीत आहे. दीर्घकाळ कोठडीत असल्याने आणि आपल्याला जामीन मिळावा यासाठी त्याने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, या प्रकरणातील गुन्ह्याचे गांभीर्य आणि उपलब्ध पुरावे पाहता न्यायालयाने त्याला दिलासा देण्यास नकार दिला आहे.

**पुराव्यांच्या आधारे जामीन अर्ज फेटाळला**

आरोपीच्या वकिलांचे सर्व युक्तीवाद सरकारी पक्षाने खोडून काढले. मुख्य सरकारी वकील अमरजितसिंह गिरासे यांनी न्यायालयासमोर देशमुख हत्याकांडाचा संपूर्ण घटनाक्रम मांडला. प्रत्येक टप्प्यावर साक्षीदार उपलब्ध असून सीडीआर रिपोर्ट, सीसीटीव्ही फुटेज सरकारकडे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या ठोस पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने कराडचा जामीन अर्ज फेटाळत, त्याला कोणतीही सवलत देण्यास स्पष्ट नकार दिला.

------------

### आता कोर्ट कचेरी नाही निवडणूक

वेगवेगळ्या कालावधीसाठी अशी अनेक अपीले प्रलंबित राहत असल्याने निवडणुका कालबद्धरित्या घेणे शक्य होत नसल्याने हा निर्णय घेण्यात आला. याबाबत राज्य निवडणूक आयोगाने शासनास या तरतुदी वगळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविला आहे. त्या अनुषंगाने राज्य शासनास अशा निवडणुकांबाबत नियम करता येतील, तसेच उमेदवारी अर्ज (नामनिर्देशनपत्रे) स्वीकारणा-या किंवा स्वीकारण्यास नकार देणा-या निवडणूक निर्णय अधिका-याचा निर्णय अंतिम असेल, अशी कलमे यात समाविष्ट करण्यात आली आहे. याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२५ काढण्यास बैठकीत मंजूरी देण्यात आली.

-------------

### विद्यापीठ परीक्षा; कॉपीबहाद्दर

जप्त करण्यात आले आहेत. त्यात कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्यासह विविध भरारी पथकांकडून ही कारवाई करण्यात आली. विद्यार्थ्यांकडे मोठ्या प्रमाणात मोबाइल आढळत आहेत. त्यामुळे परीक्षा केंद्रांवर परीक्षार्थी विद्यार्थ्यांची तपासणी, केंद्रप्रमुख, पर्यवेक्षकांचे दुर्लक्ष, असे मुद्दे समोर आले आहेत.पदवी, पदव्युत्तर पदवी परीक्षा सुरू झाल्या आहेत. गैरप्रकार रोखण्यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. आजपर्यंत कॉपी प्रकरणी १४९ विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. त्यासह ५४ मोबाइल जप्त करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. बी. एन. डोळे यांनी दिली.

------------

### मंत्र्यावर अटकेची टांगती

नाशिक सत्र न्यायालयाने मंत्री कोकाटे यांना शिक्षा सुनोल्यानंतर तातडीने पोलिसांनी त्यांना अटक करणे अपेक्षित होत असे मत कायदा तज्ञ ॲड असीम सरोदे यांनी व्यक्त केले. त्यांची आमदारकी कायद्यानुसार रद्द व्हायला हवी. कायद्यानुसार विधिमंडळ अध्यक्षांनी आमदारकी रद्द करणे अपेक्षित आहे. माणिकराव कोकाटे हॉस्पिटलमध्ये अचानक ॲडमिट झाले आहेत असा कुठला त्यांना आजार झाला हे डॉक्टरांनी स्पष्ट करणे अपेक्षित आहे. अन्यथा एका आरोपीला तुम्ही मदत करताय असे सरोदे म्हणाले. माणिकराव कोकाटे यांच्या याचिकेवर शुक्रवारी पुढील सुनावणी होणार आहे. न्या. आर एन लद्धा यांच्या एकलपीठासमोर ही सुनावणी होणार आहे.

--------------

### एसआयटी चौकशी ! बोगस

कर्मचाऱ्यांची नावे शालार्थ प्रणालीमध्ये नियमबाह्यरित्या समाविष्ट करुन वेतन अदा केल्याचे प्रकार उघडकीस आले होते. तसेच या प्रकरणात असंख्य तक्रारी देखील दाखल झाल्या होत्या. त्याची दखल घेत शालेय शिक्षण विभागाने ७ऑगस्ट २०२५ रोजी पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली विशेष चौकशी पथकाची स्थापना केली. या पथकात पोलिस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) मनोज शर्मा, शिक्षण आयुक्तालयातील सहसंचालक हारुण आतार यांचा सदस्य म्हणून समावेश होता. चौकशी पथक राज्यातील सर्व विभागीय शिक्षण उपसंचाल कार्यालयाअंतर्गत अनुदानित आणि अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता, शालार्थ मान्यता, सेवासातत्य, विना अनुदानीत वरुन अनुदानित पदावर केलेली बदली यांची तपासणी करत आहे. २०१२ पासून ते आजतागायत प्रकरणांची चौकशी करण्याचे निर्देशही पथकाला देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने शालार्थ आयडी दिलेल्या सर्व संचिका पडताळणी करून, संचिका उपलब्ध करून देण्याचे निर्देश शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे अधिकारीसूत्रांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून संचिका पडताळणी करून कागदपत्रे आहेत का, शालार्थ आयडी दिलेली शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संख्या आणि सर्व संचिका उपलब्ध आहेत का, याची पडताळणी करून घेतली जात आहे.

**बीड लातूरवर अधिक लक्ष**

मराठवाड्यात बीड, लातूर अशा अनेक जिल्ह्यातही शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना बोगस नियुक्ती दिली गेल्याच्या तक्रार दाखल झालेल्या आहेत. मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांतील शिक्षक भरतीचीदेखील चौकशी होणार असल्याचे सांगण्यात येते. अशावेळी सर्व कागदपत्रांची पडताळणी करून संचिका उपलब्ध आहेत का, याचा आढावा शिक्षणाधिकारी कार्यालयांकडून घेतला जात आहे.

--------------

### भाजपाचे बीड शहराध्यक्ष अशोक

आरोपींची ओळख करुन दिली. तेव्हा जावेद पठाण, इंगळे, करे, घुगे, ताठेने सदर जमिनीचे मंजिरि, स्वप्ना व मोहिनी मालक असल्याचे सांगितले. शिवाय, सदर जमिनीबाबत त्यांचा ११ जुलै २०२३ रोजी सामंजस्य करार झाल्याचे सांगितले. तेव्हा त्यांच्यात २ कोटी ४० लाख रुपयांचा व्यवहार ठरला होता, मात्र सदर जमीन संबंधिताच्या मालकीचीच नसल्याचे निष्पन्न झाले आणि बीड भाजपाचे शहराध्यक्ष अशोक लोढा यांची सातारा पोलीस ठाण्यामध्ये वरील लोकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला

------------

### धनंजय मुंडेंनी घेतली अमित

तिथे त्यांनी सत्ताधारी एनडीएच्या विविध नेत्यांची भेट घेतली. ते सकाळी ११ वा. संसद भवनात आले. ते तिथे जवळपास १ तास होते. त्यानंतर त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची बेट घेतली. या दोन्ही नेत्यांत काय चर्चा झाली? याचा तपशील बाहेर आला नाही. पण ही चर्चा राज्यातील विद्यमान घटनाक्रम तथा संतोष देशमुख हत्या प्रकरण या २ मुद्यांभोवती फिरता असल्याचा दावा सूत्रांकरवी केला जात आहे. त्याची अधिकृत पुष्टी होऊ शकली नाही. पण या भेटीमुळे धनंजय मुंडेंचे फडणवीस मंत्रिमंडळात पुनरागमन होणार काय? या चर्चेने जोर धरला आहे. मुख्यमंत्र्यांनी अजित पवारांना कोकाटेंकडील जबाबदारी कुणाकडे द्यायची? असा थेट सवाल अजित पवारांना केला आहे. यामुळे अजित पवारांची गोची झाली आहे. पण कोकाटेंची जागा धनंजय मुंडे यांच्या रुपात भरून काढली जाईल अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली जाईल.मात्र हि भेट राजकीय नव्हती ती भेट परळीच्या विकासासाठी होती आणि अमित शहा याना मुंडे यांनी विकास कामासंदर्भात निवेदन देखील दिले.

-------------------

### २५ लाख मिळवा सायबर

आणि ज्यांच्याकडे पैसा आहे अशांना सोशल मीडिया वरच्या वेगवेगळ्या पोस्टने भुरळ पाडली जातेय. सुंदर महिलांचे फोटो अपलोड त्यांची श्रीमंत महिला म्हणून प्रोफाइल तयार केली जाते. त्यात खूप दिवसांपासून अपत्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र, गर्भधारणा होत नाही. त्यामुळे मला आई बनायचे आहे,' असा मेसेज तयार करून तरुणांना जाळ्यात ओढले जाते. त्यानंतर तरुणांना निवडीच्या नावाखाली अंगप्रदर्शन करायला लावतात. समोरच्या व्यक्ती व्हिडिओवरून छायाचित्रे काढतात. न त्याचबरोबर या सर्व प्रकाराचे व्हिडिओ चित्रीकरण केले जाते. व्हिडिओ दाखवून ब्लॅकमेल करण्याचा व पैसे उकळण्याचा प्रकार सुरू होतो. त्यातून मोठ्या रकमा उकलल्या जातात.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. १८ डिसेंबर २०२५


## थोडक्यात



### माजलगाव न्यायालयात ई-फायलिंग प्रशिक्षण शिबीर संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव न्यायालयातील वकिलांसाठी ई-फायलिंगवर एकदिवसीय शिबीर मोठ्या उत्साहात पार पडले. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने व उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित शिबिरात ई-फायलिंग प्रक्रियेचे विविध पैलू समजावून सांगण्यात आले.

शिबिराचे उदघाट्न दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) एस.एस. बुद्रुक यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून डि.एन.चामले साहेब,मा.क.दिवाणी न्यायाधीश जी.एस खुपसे साहेब उपस्थित होते.सदरील उपक्रमासाठी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश श्रीमती राजश्री परदेशी मॅडम यांचे विशेष सहकार्य व मार्गदर्शन लाभले.मास्टर ट्रेनर म्हणून ॲड.दिपक देशमुख व ॲड.ए.डी.घाडगे यांनी ई फायलिंग विषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले.या शिबिरात संधीचे अर्ज, मुदतीसंबंधित नियम कागदपत्रे अपलोड ही प्रक्रिया यावर मार्गदर्शन करून प्रात्यक्षिक डेमो देण्यात आला.शिबिरात ईफायलिंग सारखी आधुनिक प्रणाली व्यवहारात आणण्यासाठी अशा प्रशिक्षण शिबिराचे महत्व अधोरेखित केले.सदरील कार्यक्रमाचे प्रस्तविक ॲड.दिपक देशमुख यांनी केले.तर सूत्रसंचालन ॲड.एन एम.जाधव यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिव ॲड.तेलगड यांनी विशेष परिश्रम घेतले.

### आरोग्य सेविका प्रज्ञा निकाळजे यांचे निधन

कडा । प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये कार्यरत असणाऱ्या आरोग्य सेविका प्रज्ञा शांतिनाथ निकाळजे यांचे पती शांतिनाथ निकाळजे हे प्रार्थना कार्यरत होते परंतु त्यांच्या अल्पशा आजाराने निधन झाले अन्? त्यांची पत्नी प्रज्ञा शांतिनाथ निकाळजे यांचे याच कारणामुळे निधन झाले तरी तरी त्यांच्या पश्चात एक मुलगा रोहीत ,सुन अन्? दोन मुली अन्? आई आहे त्यांच्या अशा जाण्याने सुलेमान देवळा व पंचक्रोशीत हळ हळ व्यक्त आहे.

### डॉ.रोहन बनसोडे यांची अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी निवड

आष्टी । प्रतिनिधी



आष्टी येथील दंतवैद्यकीय क्षेत्रातील नामवंत डॉ.रोहन उर्फ भाऊसाहेब पोपटराव बनसोडे यांची भारतीय दंत परिषद महाराष्ट्र राज्य सामाजिक सुरक्षा योजना शाखा अहिल्यानगर जिल्हा शहर व ग्रामीण अध्यक्षपदी निवड झाली आहे.अहिल्यानगर शहर व ग्रामीण जिल्हा दंतवैद्यकीय विभाग शाखा अहिल्यानगरचे अध्यक्षपद भूषवण्याचा मान आष्टी येथील डॉ.रोहन बनसोडे यांना मिळाल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे अहिल्यानगर जिल्हादंत वैद्यकीय शाखेची दि.१० डिसेंबर रोजी कार्यकारिणी जाहीर झाली.यामध्ये आष्टीचे डॉ.रोहन उर्फ भाऊसाहेब पोपटराव बनसोडे यांच्याकडे इंडियन डेंटल असोसिएशन -महाराष्ट्र स्टेट ब्रांच - सोशल सेक्युरिटी स्कीमचे अध्यक्षपद सर्वानुमते अविरोध सोपवण्यात आले.शाखेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ.ओंकार भालसिंग, सचिव डॉ.शिल्पा इनमुलवार,उपाध्यक्ष डॉ.प्रमोद निकरड पुढील वर्षीचे अध्यक्ष डॉ. किरण माचवे सर्व पदाधिकारी व सर्व वरिष्ठ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली ही जबाबदारी डॉ.रोहन बनसोडे यांच्याकडे सोपवण्यात आली.दंतचिकित्सक रोहन बनसोडे यांनी गेल्या १५ वर्षापासून आष्टी येथे तुलसी डेंटल क्लिनिकच्या माध्यमातून गरजू व गोरगरीब पेशंटसाठी अल्पदरामध्ये सेवा देऊन दंत वैद्यकीय क्षेत्रामध्ये आपला नावलौकिक मिळवला आहे गरजवंतांना मदतीचा हात देऊन रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा मानून ते काम करत आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते कारंजा रस्ता अतिक्रमण मुक्त

बीड । प्रतिनिधी

शहरातील अत्यंत रहदारीचा आणि गजबजलेला रस्ता म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते कारंजा या रस्त्याच्या दुतर्फा रस्त्यावरच अतिक्रमणे करून व्यवसाय थाटण्यात आले असून या मुळे नेहमीच वाहतुकीची कोंडी असल्याने ही अतिक्रमणे तत्काळ काढण्यात यावी अशी मागणी चाणक्य सामाजिक प्रतिष्ठान-बीड चे अध्यक्ष , पत्रकार प्रमोद पुसरेकर यांनी निवेदन देऊन केली होती. याची दखल मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी घेत अतिकमने काढून रस्ता मोकळा केल्याने नागरिकात समाधान व्यक्त केले जात आहे.

बीड शहरातील अत्यंत रहदारीचा आणि गजबजलेला रस्ता म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते कारंजा या रस्त्याच्या दुतर्फा रस्त्यावरच अतिक्रमणे करून व्यवसाय थाटण्यात आले राजुरीवेस भागात असणारे मुख्य डाक घर (पोस्ट ऑफिस) हे नेहमीच विविध कामासाठी नागरिकांनी गजबजलेले असते. शहरातील हजारो नागरिक रोज या कार्यालयात कामानिमित्त येत जात असतात. मात्र या कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना आपली दुचाकी,





सायकल आणि तुरळक प्रमाणात चारचाकी वाहने लावण्यास जागाच नसल्याने नागरिकांची अडचण मोठ्या प्राणावर होत आहे. या रस्त्यावर नगर परिषद कार्यालय आहे, जिल्हा मध्यवर्ती बँक आहे, छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण आहे, जिल्हा परिषद कार्यालय आहे, बांधकाम कार्यालय आहे, भाजी मंडई कडे जाण्याचा हाच रस्ता आहे, अनेक मोठे व्यासायिक प्रतिष्ठाने आहेत. त्यामुळे हा रस्ता नेहमीच गर्दीने भरलेला असल्याने वाहतुकीची कोंडी कायम ठरलेली. पण या कडे प्रशासनाकडून सोईस्करपणे दुर्लक्ष केले जात आहे. महत्वाचे म्हणजे पोस्ट ऑफिस बाहेर रस्त्यावर दुतर्फा करण्यात आलेली नालीवर अतिक्रमण धारक हातगाडे विक्रेते यांचे स्वतः ची खाजगी मालमत्ता असल्या प्रमाणे कब्जा करून बसले आहेत.अर्धा रस्ता काबीज करण्यात आला आहे. तसेच या ठिकाणी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना हे अतिक्रमण धारक हातगाड्यासमोर दुचाकी लावण्यास अलिखित मनाई हुकूम करण्यात आला आहे. जर कोणी दुचाकी, सायकल लावण्याचा प्रयत्न केला तर आधी शिव्या, नंतर धमकी आणि वेळ प्रसंगी अंगावर धावून येण्याचे प्रकार काही वेगळे नाहीत. त्यातच भर म्हणून शहर वाहतूक पोलीस दंडात्मक कारवाई करण्यास कसलीच कसर सोडत नाहीत. रोज या ठिकाणी गाडी पार्किंग केल्या मुळे नागरिकांना आर्थिक झळ पोहचत आहे.त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक, शारीरिक, मानसिक पिळवणूक होत आहे. ही पिळवणूक .मुख्याधिकारी,नगर परिषद,बीड. यानी ही अतिक्रमणे तत्काळ काढून नागरिकांना दिलासा देऊन त्यांची आर्थिक, शारीरिक, मानसिक पिळवणूक थांबवावी ही विनंती चाणक्य सामाजिक प्रतिष्ठान चे अध्यक्ष, पत्रकार प्रमोद पुसरेकर यांनी केली केली होती. लवकरात लवकर ही अतिक्रमण न काढल्यास लोकशाही मार्गाने उपोषण करून आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा त्यांनी दिला होता. याची दखल घेत बुधवार १७ डिसेंबर रोजी सकाळीच या अतिक्रमण हटविणे मोहिमेस सुरवात करण्यात आली. जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी सुभाष सानप पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर पोलीस हवालदार आदिनाथ मुंडे, राहुल गायकवाड ,राजाभाऊ तांदळे पोलीस अंमलदार वसीम शेख, बनसोडे नगरपालिका अतिक्रमण पथक प्रमुख मुन्ना गायकवाड , पवन लाहोट, सुजीत जाधव, लखन तुसंबड़ , विकी गागट, राम रोकड़े, किरण भिसे. ट्रॅकर,जेसीबी सह वाहतूक पोलिस निरीक्षक सानप, जाधवर यांनी दिवसभर ही मोहिम राबवून हा रस्ता अतिक्रमण मुक्त करून नागरिकांना दिलासा दिल्याने प्रशासनाचे अभिनंदन केले जात आहे.

## स्वच्छ व हरित विद्यालय स्पर्धेत नफरवाडी शाळेची राज्यस्तरासाठी निवड

पाटोदा । प्रतिनिधी

भारत सरकारच्या वतीने घेण्यात येणाऱ्या स्वच्छ व हरित विद्यालय स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्यामधून आठ शाळांची निवड राज्यस्तर मूल्यांकनासाठी झाली आहे. या मध्ये आय.एस.ओ.मानांकित जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नफरवाडी या शाळेने जिल्हास्तरीय मूल्यांकनामध्ये जिल्ह्यामध्ये फाइव स्टार रेटिंग मिळवली आहे. लवकरच राज्यस्तरीय मूल्यांकन करण्यासाठी राज्याचे पथक शाळेला भेट देणार आहे.या मूल्यांकनानंतर शाळेची फाइव स्टार रेटिंग कायम राहिल्यास दिल्ली येथे मुख्याध्यापक शिक्षक व विद्यार्थ्यांचा सन्मान केंद्र शासनाच्या वतीने केला जाणार आहे.





शाळेतील स्वच्छता,शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृह,हॅन्ड वॉश स्टेशन, वृक्षारोपण, मिशन लाईफ, इको क्लब, सोलार पॅनल सुविधा,रेन वॉटर हार्वेस्टिंग सुविधा,वृक्ष संवर्धन,कचरा व्यवस्थापन, स्वच्छता विषयक निबंध स्पर्धा,चित्रकला स्पर्धा,परसबाग,एक पेड माँ के नाम या कार्यक्रमातील विद्यार्थ्यांचा सहभाग व इतर स्वच्छता विषयक बाबींची पाहणी करून शाळेची निवड करण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक अण्णासाहेब खंडागळे सर, शाळेतील शिक्षक मुरूमकर सर,राऊत सर,काकडे मॅडम,सानप मॅडम,सर्व विद्यार्थी, शालेय व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या सहकार्याने हे यश मिळाले आहे.

यापूर्वीही नफरवाडी शाळेला सन २०२२ मध्ये जिल्हास्तरीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार प्राप्त झालेला आहे त्याचबरोबर मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक एक मध्ये पाटोदा तालुक्यात द्वितीय क्रमांक तर टप्पा क्रमांक दोन मध्ये पाटोदा तालुक्यात प्रथम क्रमांक आलेला आहे.

या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंदाचे आमदार सुरेश अण्णा धस साहेब,पाटोदा तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी बोंदार्डे साहेब,जेष्ठ शिक्षणविस्ताराधिकारी गव्हाणे साहेब, राहिंज साहेब,नफरवाडी गावच्या सरपंच सौ.विद्याताई बंडू सवासे,उपसरपंच सौ.शितलताई केशव तांबे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उत्तरेश्वर औटे, उपाध्यक्ष अशोक वाघ,अतिष तांबे,लहू दराडे,बालाजी जाधव,रेखा बाळू ढोले,अश्विनी दगडू मंडलिक,मीरा अशोक मंडलिक,उर्मिला रविकांत वनवे,संजय सावंत सर,गोरक्ष सवासे तसेच शाळा व्यवस्थापन समिती माजी अध्यक्ष,उपाध्यक्ष सर्व सदस्य गावचे माजी सरपंच,माजी उपसरपंच,सर्व आजी,माजी ग्रा.पं.सदस्य या सर्वांनी अभिनंदन केले आहे व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

कोणतेही यश योगायोगाने मिळत नाही तर त्यामागे अविरत,सातत्यपूर्ण प्रयत्न असतात हे अधोरेखित करणारे यश म्हणजेच आमच्या शाळेची राज्यस्तरासाठी झालेली निवड...

अण्णासाहेब महादेव खंडागळे
मुख्याध्यापक
जि.प.प्रा.शा.नफरवाडी
ता.पाटोदा जि.बीड

## पान ६ वरुन...

### आज बीडमध्ये होणारी

झाले. या खेळाच्या माध्यमातून अनेक खेळाडू पोलीस भरतीमध्ये, आर्मी भरतीमध्ये, तसेच शासकीय, निमशासकीय सेवेमध्ये मोठ्या संख्येने लागले आहेत. बीड जिल्हा खो खो असोसिएशन ही क्रीडा संघटना ऑगस्ट १९७६ पासून आज पर्यंत क्रियाशील असलेले एकमेव ४९ वर्षाची एकमेव संघटना आहे. या संघटनेचे स्थापनेपासून आजपर्यंत सचिव म्हणून शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रा. जनार्दन शेळके हे स्वतः आहेत. ते या संघटनेचे संस्थापक सचिव असताना सुद्धा त्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी प्रसिद्धीच्या मोहापाई त्यांनी स्वतःची वेगळी एमॅच्युअर खो खो संघटना दोन वर्षांपूर्वी स्थापन केली. यामागे त्यांचा कुटील डाव दिसत आहे. ज्यामुळे भविष्यात खो खो खेळाडूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते. त्याचबरोबर खेळाच्या पवित्र मैदानावर अशा पद्धतीने चुकीचे पायंडे निर्माण झाले तर या चांगल्या खेळाला डाग लागेल. प्रा. जनार्दन शेळके यांचे कधीही मैदानाला पाय लागलेले नाहीत. ते आज ८० वर्षाचे वयोवृद्ध आहेत. केवळ चाचणी स्पर्धेत यायचे उद्घाटन करायचं, खेळाडूंना थातूरमातूर मार्गदर्शन करायचं आणि निघून जायचं. पुन्हा थेट पुढच्या वर्षीच्या स्पर्धेच्या वेळीच यायचे. असा यांचा खो-खो प्रवास आहे. त्यांच्या स्वार्थी प्रवृत्तीला आणि वयोमानानुसार थांबण्याचा सल्ला दिल्यामुळे त्यांचा इगो हर्ट झाला असावा त्यामुळेच त्यांनी बीड जिल्हा खो खो असोसिएशनचे स्वतः सचिव असताना सुद्धा या संघटनेला अंधारात ठेवून नियमबाह्य दुसरी एमॅच्युअर खो-खो संघटना स्थापन केली आणि या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनची दिशाभूल करून मागील ४८ वर्षापासून महाराष्ट्र खो-खो असोसिएशनला असलेली बीड जिल्हा खो खो असोसिएशनची सलग्नता रद्द करून आता नव्याने स्थापन केलेल्या एमॅच्युअर खो खो असोसिएशनला नियमबाह्य संलग्नता मिळवली. हे नियमबाह्य असल्यामुळेच या प्रवृत्तीला विरोध करण्यासाठी आम्ही त्यांनी आयोजित केलेल्या ६१ व्या राज्यस्तरीय पुरुष महिला अजिंक्यपद खो-खो स्पर्धेवर बहिष्कार टाकत आहोत. या गंभीर बाबीची पालकमंत्री तथा महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे अध्यक्ष महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी स्वतः लक्ष घालून या नियमबाह्य स्पर्धेची चौकशी करून दोषीविरुद्ध कठोर कारवाई करावी. भविष्यात खेळाडूंची होणारी वाताहत थांबावी थांबवावी अशी मागणी देखील पत्रकार परिषदेत बीड जिल्हा खो खो असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा तानाजी आगळे व सदस्य सौ चित्रा आगळे यांनी केली आहे

### ढाळेवाडीत बिबट्याची पुन्हा

या घटनेची माहिती मिळताच पाटोदा पंचायत समितीचे माजी सभापती तात्यासाहेब हुले यांनी तात्काळ आमदार सुरेश धस यांच्याशी संपर्क साधला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार धस यांनी त्वरित वनविभागाच्या अधिकाऱ्यांना कळवले आणि घटनास्थळाचा पंचनामा करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

परिसरात भीतीचे वातावरण, उपाययोजनांची मागणी:

ढाळेवाडी आणि आसपासच्या भागात बिबट्याचे दर्शन वारंवार होत असल्याने शेतकरी रात्री-अपरात्री शेतात जाण्यास कचरत आहेत. पिकांच्या रक्षणासाठी किंवा इतर कामांसाठी शेतात जाणे धोक्याचे ठरत आहे. या पार्श्वभूमीवर, स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांनी वनविभागाकडे तातडीने या परिसरात पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा, तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

### लोकनेते गोपीनाथ मुंडेसाहेब

व खाऊ वाटप करण्यात आले.

कार्यक्रमात विविध क्रीडास्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले. यावेळी चंद्रकांत बप्पा फड, भास्कर दादा तांदळे, पांडुरंग नाना राख आदी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी खो-खो सामन्याचे आयोजन करण्यात आले असून उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बिनवडे सर, हनुमंत दादा तांदळे, प्रदीप बाप्पु तांदळे व वाघमारे दिगंबर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास तिन्ही शाळांचे शिक्षकवृंद, अंगणवाडी सेविका, कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ॲड.चंद्रकांत नवले यांनी

जास्तीत जास्त शिवसेना शाखा स्थापन करणार असल्याचे सांगितले. येणाऱ्या निवडणुकीत शिवसेना घरोघरी पोहोचवण्यासाठी सर्व पदाधिकारी व शिवसैनिकांनी एकजुटीने काम करावे या कामासाठी मी सदैव तुमच्या सोबत असेल असा विश्वास दिला.यावेळी उपजिल्हाप्रमुख ॲड. नारायण शिंदे, तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके, शहरप्रमुख मुकेश अण्णा महाजन, विधानसभा प्रमुख नवनाथ गवते, युवा सेना विधानसभा प्रमुख उमेश शिंदे, युवा सेना तालुकाप्रमुख विशाल मोघे,ओबीसी तालुका प्रमुख बाळासाहेब खेडकर, युवा सेना शहरप्रमुख गणेश पवार, तसेच कैलास पोटफोडे, नागेश मिठे, शिवराज उगले, गणेश डेंगळे, अभय भरत भांडवलकर, सचिन हातागळे, तेजस साबळे, विठ्ठल पवार, प्रकाश नरनाळे, अंकुश गिरीआणि इतर शिवसैनिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्रृंगेरीदेवीकडे जाणाऱ्या

यात्रेच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने रस्त्यांची पाहणी करून सर्व खड्डे भरावेत, वाहून गेलेल्या साईडपट्ट्या दुरुस्त कराव्यात व सुरक्षित वाहतूक सुनिश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत येत्या दोन दिवसांत ठोस कार्यवाही न झाल्यास ग्रामस्थांच्या सहकार्याने आंदोलन छेडण्याचा इशाराही सामाजिक कार्यकर्ता अशोक पोकळे यांनी दिला आहे.

## संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथीनिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप

बीड । प्रतिनिधी

संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज सामाजिक प्रतिष्ठान व संत संताजी जगनाडे महाराज क्रीडामंडळ, रविवार पेठ, तेली गल्ली, बीड यांच्या वतीने बुधवार दि. १७ डिसेंबर रोजी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी रविवार पेठ, तेली गल्ली येथे श्री. संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन करून पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न झाला. दरवर्षीप्रमाणे यंदाही हा कार्यक्रम श्रद्धा व उत्साहात पार पडला. तसेच जि. प. प्राथमिक शाळा, पांगरबावडी येथेही पुण्यतिथी निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी श्री. संत संताजी जगनाडे महाराज




यांच्या प्रतिमेचे पूजन करून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास जि. प. प्राथमिक शाळा पांगरबावडीचे शिक्षक व कर्मचारीवर्ग तसेच संस्थेचे मान्यवर चंद्रकांत वामने, गणेश पवार, शिवाजी झांबरे, राजू चेके, दिलीप मुळे, मनोज क्षीरसागर, अंकुश शेनकुडे, हर्षद क्षीरसागर, नंदकिशोर पवार, दीपक क्षीरसागर, अनंत गोरे यांच्यासह समस्त तेली समाज बांधव व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमादरम्यान शिक्षक व मान्यवरांनी संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकी, शिक्षणाचे महत्त्व व संस्कारांचे महत्त्व याबाबत बहुमूल्य मार्गदर्शन केले.

## 'अनस्क्रिप्टेड' चे अनौपचारिक सोहळ्यात प्रकाशन

बीड । प्रतिनिधी

मूळ बीड येथील रहिवासी, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात पुणे येथे कार्यरत असलेले, जेष्ठ पत्रकार अशोकजी देशमुख (अप्पा) यांचे जेष्ठ सुपुत्र अमोल देशमुख यांच्या ''अनस्क्रिप्टेड'' या ललित कथासंग्रहाचे पुणे येथील पुस्तक महोत्सवात दिनांक १६ डिसेंबर रोजी, छोटेखानी अनौपचारिक सोहळ्यात प्रकाशन झाले.

अमोल यांनी आपली नोकरी सांभाळून मागील काही वर्षांत विविध विषयांवर विपुल लेखन केले, त्यात संगीत, कलाकार, मनांतील भावना, व्यक्तिचित्रण, काही घटना, एखाद्याच्या आयुष्यतील मनाला भिडलेल्या प्रसंगाला शद्बबद्ध केले. अनेक जेष्ठ, मित्र यांनी आता हे सर्व लिखाण आणि त्यातील निवडक लेखांचे एक पुस्तक व्हावे असे अमोल यांना सुचवले गेले. यातूनच ''अनस्क्रिप्टेड'' चा जन्म झाला. पुस्तकाला प्रस्तावना डॉ. सुधीर गव्हाणे सरांची लाभली, आणि मलपृष्ठ श्री. वसंत बिवरे सरांच्या शब्दांत सजले आहे. मुंबईचे वासुदेव





बोंद्रे यांनी पुस्तकाचे कव्हर पेज डिझाइन केले.

१६ तारखेच्या या छोटेखानी सोहळ्यात हजर असलेले लेखक दिग्दर्शक, अभिनेते श्री. प्रविण तरडे, सैराटचे नागराज मंजुळे, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष श्री. प्रविण गायकवाड, लेखक, प्रकाशक, उद्योजक श्री. शरद तांदळे, त्यांच्या पत्नी आणि न्यू इरा पब्लिशिंग हाऊसच्या सर्वेसर्वा सौ. अमृता तांदळे यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशित करून विक्रीसाठी उपलब्ध केले.

यावेळी न्यू इराचे सर्व कर्मचारी ईतर पुस्तके लिहिलेले लेखक, लेखिका यांनीही पुस्तकाला शुभेच्छा दिल्या.श्री. तरडे पुस्तकाच्या नावावरून भारावून गेले, त्यांनी अमोल यांच्याशी बोलतांना विशद केले की, पुस्तक लिहिणारा खरा लेखक असतो, आम्ही चित्रपट लिहिला तरीही आमच्यावर लेखकाचा शिक्का बसत नाही. आपण उत्तम काम केले आहे, पुस्तक नक्की वाचणार अशा शब्दात कौतुक केले. नागराज मंजुळे, प्रवीण गायकवाड यांनीही कौतुक करत पुस्तकाला आणि लेखकाला शुभेच्छा दिल्या. पुस्तक ऑनलाइन विक्रीसाठी लवकरच उपलब्ध होईल. सर्वांनी पुस्तक विकत घेऊन वाचावे असे आवाहन श्री. तांदळे आणि लेखक देशमुख यांनी केले.


**जाहीर प्रगटन**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय शिरूर का. जि.बीड**

Email. tahshildarshirurkasar@gmail.com

**दूरध्वनी क्रमांक ०२४४४२५९३५९**

**क्र.२०२५ /विलंब जन्म नोंद/कावि-(ई-२५६०२४०)**

**विलंब जन्म नोंदणी जाहीर प्रगटन**

मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर का. यांच्या न्यायालयात जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये दाखल प्रकरणात जन्म नोंद घेण्याबाबत

ज्याअर्थी अर्जदार नामे सीमा भ्र.योगेश पंडुरे रा.राळेसांगवी ता. शिरूर कासार जि. बीड यांनी स्वतःची मुलगी नामे अमृता पि.योगेश पंडुरे रा. राळेसांगवी, ता. शिरूर कासार, जि. बीड यांचा जन्म दिनांक २६/०२/२०१९ रोजी राळेसांगवी ता. शिरूर कासार, जि. बीड येथे झाल्याचा विलंब जन्म नोंदणी आदेश मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी या जन्म दिनांका बाबत कोणास आक्षेप असल्यास सदर अक्षर स्वतः किंवा आपले वकिलामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून १५ दिवसात नोंदवावा. अन्यथा कोणाचाही काही आक्षेप नाही असे समजून अर्जाची सोनवणे घेऊन विलंबाने जन्म नोंद घेण्याबाबत आदेश केला जाईल.

स्वाक्षरित **क लिपीक** | शिक्का | **सुरेश घोळवे** तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर कासार



**जाहीर प्रगटन**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय शिरूर का. जि.बीड**

Email. tahshildarshirurkasar@gmail.com

**दूरध्वनी क्रमांक ०२४४४२५९३५९**

**क्र.२०२५ /विलंब जन्म नोंद/कावि-(ई-२५६०२३२)**

**विलंब जन्म नोंदणी जाहीर प्रगटन**

मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर का. यांच्या न्यायालयात जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये दाखल प्रकरणात जन्म नोंद घेण्याबाबत

ज्याअर्थी अर्जदार नामे सीमा भ्र.योगेश पंडुरे रा.राळेसांगवी ता. शिरूर कासार जि. बीड यांनी स्वतःची मुलगी नामे राणी पि.योगेश पंडुरे रा. राळेसांगवी, ता. शिरूर कासार, जि. बीड यांचा जन्म दिनांक २६/०२/२०२१ रोजी राळेसांगवी ता. शिरूर कासार, जि. बीड येथे झाल्याचा विलंब जन्म नोंदणी आदेश मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी या जन्म दिनांका बाबत कोणास आक्षेप असल्यास सदर अक्षर स्वतः किंवा आपले वकिलामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून १५ दिवसात नोंदवावा. अन्यथा कोणाचाही काही आक्षेप नाही असे समजून अर्जाची सोनवणे घेऊन विलंबाने जन्म नोंद घेण्याबाबत आदेश केला जाईल.

स्वाक्षरित **क लिपीक** | शिक्का | **सुरेश घोळवे** तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर कासार



जा.क्र.न.प.अंबड/नामांतर/२०२५/७१०
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक ८/१२/२०२५

**नाव बदलण्याचा जाहिरनामा**

अर्जदार श्री./सौ. श्रीमती :- १) अशोक देसाई झाकणे २) उषा अशोक झाकणे

प्रकरण : सर्वे नं -१२ प्लॉट नं- ४६ (अ) सिटी सर्वे नं- १८६७/अ/६४ न.प. मि.नं-१८-१११-४६ चे हस्तांतरन बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (१८-१११-४६ दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुःसिमा
पुर्व - ६ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम :- प्लॉट नं.४५
दक्षिण :-कैलास दत्तू लहामगे यांचा प्लॉट नं.४६
उत्तर प्लॉट नं - ४७

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**



जा.क्र.न.प.अंबड/नामांतर/२०२५/७१५
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक ८/१२/२०२५

**नाव बदलण्याचा जाहिरनामा**

अर्जदार श्री./सौ. श्रीमती :- १) सुचिता गणेश पेदाटे २) गणेश भागवत पेदाटे

प्रकरण : सर्वे नं -१२ प्लॉट नं- ३९ (अ) सिटी सर्वे नं- १८६७/अ/५१ न.प. मि.नं-१८-१११-३९ (अ) चे हस्तांतरन बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (१८-१११-३९ (अ)) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुःसिमा
पुर्व - प्लॉट नं- ३४ ब
पश्चिम :- ९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण :-प्लॉट नं- ३९ ब
उत्तर प्लॉट नं - ३८ ब


**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

# गुगलची मोठी घोषणा! भारतात अब्जावधी रुपयाची गुतवणूक करणार

## शेती आणि वैद्यकीय क्षेत्राला बळकटी मिळणार

दिल्ली । प्रतिनिधी

जगातील सर्वात मोठ्या टेक कंपन्यांपैकी एक असलेल्या गुगलने एक मोठी घोषणा केली. कंपनी भारतात अब्जावधी रुपयांची गुंतवणूक करत आहे. खरं तर, कंपनीने आरोग्य, शेती, शिक्षण आणि शाश्वत शहरांसाठी भारतातील एआय सेंटर्स ऑफ एक्सलन्सला ८ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची निधी देण्याची घोषणा केली. याव्यतिरिक्त, भारताच्या आरोग्य मॉडेलच्या विकासाला पाठिंबा देण्यासाठी त्यांनी ४००००० अमेरिकन डॉलर्सची वचनबद्धता दर्शविली आहे. भारतीय भाषांसाठी उपाय प्रदान करणारे मॉडेल तयार करण्यासाठी गुगल ., . आणि ला ५०००० अमेरिकन डॉलर्सचे अनुदान देखील देत आहे.





गुगलने म्हटले आहे की ते आरोग्य आणि शेतीसाठी बहुभाषिक एआय-संचालित अनुप्रयोगांना समर्थन देण्यासाठी वाधवानी एआयला ४.५ दशलक्ष डॉलर्स देत आहे. कंपनीने म्हटले आहे की या घोषणा भारताच्या एआय इकोसिस्टमला बळकटी देण्यासाठी गुगलने केलेल्या नवीन सहकार्यांची आणि निधी वचनबद्धतेची मालिका प्रतिबिंबित करतात. अमेरिकन कंपनीने म्हटले आहे की गुगलने भारतात आरोग्य मॉडेल तयार करण्यासाठी मेडगेम्माचा वापर करून नवीन सहकार्यांना समर्थन देण्यासाठी ४००००० डॉलर्सची घोषणा केली आहे. गुगल कंपनीने आरोग्य, शेती, शिक्षण आणि शाश्वत शहरांसाठी भारतातील एआय सेंटर्स ऑफ एक्सलन्सला ८ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची निधी देण्याची घोषणा केली.

याचा मोठा फायदा शेती आणि आरोग्य क्षेत्रासाठी होणार आहे. सध्या सर्वत्र एआय तंत्राचा वापर केला जात आहे. या माध्यमातून शेती क्षेत्रात देखील बदल घडत असल्याचे पाहायला मिळत आहे. एआ तंत्रज्ञानाचा वापर करुन शेतातील उत्पागन वाढत असल्याचे पाहायला मिळत आहे. गुगलने म्हटले आहे की अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) च्या तज्ञांशी सहयोग करून त्वचाविज्ञान आणि बाह्यरुग्ण उपचारांमध्ये भारत-विशिष्ट अनुप्रयोगांना समर्थन देणारे मॉडेल विकसित करेल.

याव्यतिरिक्त, आयआयएससी (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स) मधील संशोधक, एआय तज्ञ आणि क्लिनिशियन व्यापक क्लिनिकल अनुप्रयोगांसाठी एआय मॉडेल्सचा वापर एक्सप्लोर करतील. त्याचा समावेशक एआय अजेंडा पुढे नेण्यासाठी, गुगलने आयआयटी मुंबई येथे एक नवीन भारतीय भाषा तंत्रज्ञान संशोधन केंद्र स्थापन करण्यासाठी २ दशलक्षचे प्रारंभिक योगदान जाहीर केले आहे. गुगलने म्हटले आहे की या उपक्रमाचे उद्दिष्ट भारताच्या भाषिक विविधतेनुसार जागतिक प्रगती सुनिश्चित करणे आहे. भारताच्या एआय इकोसिस्टमला बळकटी देण्यासाठी गुगलने केलेल्या नवीन सहकार्यांचा मोठा फायदा होणार आहे.

## भारत सरकारतर्फे २,४८१ कोटी रुपयाच्या नैसर्गिक शेती राष्ट्रीय अभियानास सुरुवात

दिल्ली : नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी भारत सरकारने १० दशलक्ष शेतकऱ्यांमध्ये रूपये २,४८१ कोटींचे राष्ट्रीय अभियान सुरू केले आहे. या उपक्रमाचा उद्देश मातीची गुणवत्ता सुधारणे आणि पारंपरिक शेती आणि पशुधन यांच्या एकात्मिक पद्धतींद्वारे रासायनिक मुक्त अन्न प्रदान करणे हे आहे. या प्रोग्राममध्ये सर्टीफिकेशनची सोपी पद्धती, ब्रँडिंग आणि ऑनलाइन देखरेख यांचा समावेश असेल.



सरकारने देशभरातील १० दशलक्ष शेतकऱ्यांमध्ये नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी २,४८१ कोटीच्या बजेट खर्चासह राष्ट्रीय मिशन जाहीर केले. शाश्वत शेतीसाठी एक मजबूत व्यवस्था निर्माण करणे हा मंत्रिमंडळाच्या निर्णयाचा उद्देश आहे. १५ व्या वित्त आयोगापर्यंत (२०२५-२६) भारत सरकारचा हिस्सा १,५८४ कोटी आणि राज्यांचा ८९७ कोटी असेल.

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले, ''मातीचा दर्जा सुधारण्याची आणि रासायनिक मुक्त अन्नाद्वारे लोकांचे आरोग्य राखण्याची गरज आहे. नैसर्गिक शेतीसाठी राष्ट्रीय अभियान हा एक महत्वाचा निर्णय आहे'', असेही त्यांनी सांगितले. या योजनेनुसार शेतकऱ्यांना त्यांच्या नैसर्गिक शेती उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी एक सोपी प्रमाणपत्र प्रणाली आणि समर्पित कॉमन ब्रँडिंग प्रदान केले जाईल. अंमलबजावणीसाठी रिअल-टाइम जिओ-टॅग केलेले आणि संदर्भित मॉनिटरिंग ऑनलाइन पोर्टलद्वारे केले जाईल. पूर्वजांकडून मिळालेल्या पारंपारिक ज्ञानात रुजलेले, शेतकरी नैसर्गिक शेतीचा सराव करतील ज्यामध्ये स्थानिक पशुधन एकात्मिक नैसर्गिक शेती पद्धती, वैविध्यपूर्ण पीक प्रणाली इत्यादींचा समावेश आहे, असेही सरकारने एका निवेदनात म्हटले आहे.

## आडसाली उसाचे पाचट काढण्याचे फायदे

ऊस लागवड केल्यानंतर उसाचे पाचट काढावे की न काढावे या द्विधा मनस्थितीत शेतकरी असतो. आपण बघितले तर प्रत्येक उसाच्या पेऱ्याजवळ उसाचे पान असते. सुरुवातीची आणि शेवटची पाने अरुंद व निमुळती दिसतात. मध्यंतरीची पाने १ ते २ इंच रुंद असतात. ही पाने जवळपास १ मीटर लांबीची असतात. पूर्ण वाढ झालेल्या उसाला हिरवी १० पाने असतात.उभ्या उसातील पाचट काढण्याचे फायदे : उसातील वाळलेले पाचट काढल्यामुळे पिकामध्ये हवा खेळती राहते. सूर्यप्रकाश मुळापर्यंत जातो त्यामुळे वाटरशुट म्हणजेच कोंब वाढण्यास मदत होते तसेच उसाची जाडी वाढते. सरीमधून जाणे-येणे सोपे होते त्यामुळे उसाला खते घालणे, ड्रेंचिंग करणे ही कामे करणे सहजरीत्या करता येतात. उसामध्ये फिरता येत असल्यामुळे उसातील कीड व रोग लक्षात येतात, त्यामुळे उपाययोजना करणे सोपे होते. १ एकर क्षेत्रातून सरासरी २ ते ३ टन पाचट मिळते. १ टन पाचटापासून सरासरी २० कि.ग्रॅ. नत्र, १० कि.ग्रॅ. स्फुरद व १० ते २० कि.ग्रॅ. पालाश इतके खत मिळते. पाचटामुळे जमिनीवर आच्छादन झाल्यामुळे तण नियंत्रणासाठी फायदा होतो. तसेच पाचटाखाली जिवाणूंची चांगली वाढ होते.उस पाचट काढताना घ्यायची काळजी : आडसाली उसाचे पाचट डिसेंबर महिन्यापूर्वी म्हणजेच ऊस पाच ते सहा महिन्याचा झाल्यानंतर मोठ्या भरणीनंतर काढावे. आडसाली उसाचे पाचट डिसेंबरनंतर काढू नये कारण फेब्रुवारीपासून उन्हाळा सुरु झाल्यामुळे उन्हाच्या झळा आतमध्ये शिरतात त्यामुळे उसातील पाण्याचे बाष्पीभवन होते. त्यामुळे ऊस सुकल्यासारखा दिसतो. उस पाचट काढताना हिरवी पाने काढू नयेत, कारण ऊस पिकाला लागणारे अन्न या पानामध्ये तयार होते. त्यामुळे हिरव्या पानाचे क्षेत्रफळ जेवढे कमी होईल तेवढे उसाची अन्न तयार करण्याची प्रक्रिया कमी होते. त्यामुळे उसाची जाडी वाढत नाही. बियाणासाठी ठेवलेल्या उसाचे पाचट काढू नये. फुले २६५, १०००१, ८००५ या वाणाच्या उसाचा पाला किंवा पाचट काढू नये.

# हळद पीक व्यवस्थापन

हळद लागवड होऊन सात महिन्यांचा कालावधी (२१० दिवस) पूर्ण झाला आहे. या कालावधीमध्ये पिकामध्ये हळकुंड भरणे ही महत्त्वाची अवस्था सुरु झालेली असते. या अवस्थेत हळकुंडाची जाडी आणि वजन वाढण्यास मदत होत असते. नव्याने आलेल्या फुटव्यांपासून हळकुंड भरण्याचा हा कालावधी असतो. यावेळी वातावरणात साधारणपणे १८ ते २० अंश सेल्सिअस तापमान असते. प्रकाश संश्लेषण क्रियेतून पानांत तयार झालेले अन्न खोडाद्वारे हळकुंडापर्यंत पोहोचत असते. अशावेळी पाने निरोगी राहणे गरजेचे असते.हळद पिकाच्या योग्य वाढीसाठी सद्यःस्थितीत आंतरमशागतीची कामे वेळेवर करणे गरजेचे आहे. यामध्ये खते देणे, पाणी व्यवस्थापन, तण नियंत्रण, फुलांचे दांडे न काढणे इत्यादी महत्त्वाच्या कामांचा समावेश होतो. जर तापमान फारच कमी झाले, तर हळद पिकांवर विविध कीड-रोगांचा प्रादुर्भाव होत असतो. परिणामी गड्ड्यांची संख्या आणि आकार यावर परिणाम होतो. अशावेळी हळद पिकाचे योग्य व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे.



आंतरमशागत (भरणी करणे) : हळद पिकाला मातीची भर लावलेली नसेल, तर फुटव्यांपासून नव्याने आलेले हळकुंड उघडे राहतात. हळकुंड सूर्यप्रकाशात सान्निध्यात आल्यास ते हिरवे पडतात आणि वाढ खुंटते. उघड्या राहिलेल्या हळकुंडावर किंवा गड्ड्यांवर कंदमाशी सारख्या किडी अंडी घालतात. त्यामुळे कंदकुज रोगाचा प्रसार होतो. त्यासाठी तत्काळ मातीची भर लावून हळकुंडे पूर्णपणे झाकून घ्यावीत. त्यामुळे हळकुंडांचे चांगले पोषण होऊन चांगली पोसली जातात. हळदीच्या दोन्ही गड्ड्यांमधील मोकळ्या जागेमधील माती १.५ ते २ इंच शिपीच्या कुदळीने खणून दोन्ही बाजूंच्या गड्ड्यांना लावणे म्हणजेच भरणी करणे. भरणी केल्यामुळे नवीन येणारे हळकुंडे झाकले जाऊन त्यांची चांगली वाढ होते. योग्यवेळी भरणी केल्यामुळे एकूण उत्पादनामध्ये साधारणपणे १० ते १५ टक्के वाढ झाल्याचे दिसून आले आहे. गादी वाफ्यावर भरणी करताना पॉवर टिलरच्या साह्याने किंवा दोन गादीवाफ्यांमधील जागेतील माती मोकळी करून गादीवाफ्यावर भर द्यावी. पॉवर टिलरद्वारे भरणी केल्यामुळे मजुरी खर्चात बचत होते. गादीवाफ्यावर ठिबक सिंचन केले असल्यास, भरणी करताना ड्रीपर मातीखाली जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

खत व्यवस्थापन : शाकीय वाढ पूर्ण झाल्यानंतर हळद पिकास कोणतीही नत्रयुक्त रासायनिक खते जसे युरिया देऊ नये. नत्रयुक्त खते दिल्यामुळे पिकाची अतिरिक्त शाकीय वाढ होते. परिणामी हळद पिकाची पुढील अवस्था जसे हळकुंड भरणे, हळकुंडाची जाडी आणि वजन वाढणे लांबणीवर पडते. ज्या ठिकाणी पोटॅशयुक्त खतांची कमतरता असेल, तेथे हेक्टरी १२५ किलो पांढरा पोटॅश द्यावा. त्यामुळे हळकुंडांचे वजन वाढून हळकुंडांना चकाकी येते.

सिंचन व्यवस्थापन : पावसाळा सुरू झाल्यानंतर पावसाचे पाणी जमिनीमध्ये साठून राहणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकामध्ये पाणी साठून राहिले तर मुळांना हवा (ऑक्सिजन) घेण्यास अडथळा निर्माण होतो. परिणामी हळदीची पाने पिवळी, निस्तेज होऊन मलूल होतात. त्यासाठी पिकामध्ये साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा तत्काळ निचरा करावा. वाकोऱ्याची शेवटची सरी कुदळीच्या साह्याने फोडून पाणी काढून द्यावे. जमिनीतील ओलावा अभ्यासून पाणी देण्याचे नियोजन करावे. रुंद वरंबा पद्धतीने लागवड असल्यास ठिबक सिंचनाचा अवश्य उपयोग करावा. ठिबक सिंचनाच्या वापरामुळे पाण्याचा अपव्यय टाळला जाऊन जमिनीचे जैविक गुणधर्म सुधारण्यास मदत होते. परिणामी जमिनीमध्ये मुळांच्या भागांत वाफसा लवकर आणि जास्त प्रमाणात तयार होतो. त्यामुळे सूक्ष्मजिवांच्या क्रिया सुधारतात, मातीची सच्छिद्रता वाढते, जलधारणक्षमता वाढते, जमिनीची उत्पादनक्षमता वाढते. अन्नद्रव्यांचे वहन सुलभ होऊन हळद पिकांच्या मुळाद्वारे शोषण अधिक होते. सूक्ष्म पाने लवकर मोठी होतात. एकूण पीक उत्पादनात वाढ होऊन हळदीचा मुख्य गुणवत्ता घटक असलेल्या कुरकुमीन प्रमाण वाढण्यास मदत होते.

ठिबकद्वारे सिंचन करताना दोन लॅटरमधील अंतर ४ ते ५ फूट ठेवावे. दोन तोट्यांमधील अंतर जमिनीच्या प्रतीनुसार ठेवावे. रेताड जमिनीमध्ये तुषार किंवा ठिबक सिंचनाचा उपयोग अत्यंत उपयुक्त ठरतो. जमिनीतील ओलाव्यानुसार ठिबक संच चालू ठेवावा. सतत पाणी सोडू नये. त्यामुळे सतत ओलावा राहून हळकुंडे कुजण्याची शक्यता असते. हिवाळ्यामध्ये पाण्याच्या दोन पाळ्यांमधील अंतर १२ ते १५ दिवस ठेवावे. पाऊस समाधानकारक असेल, तर हलक्या ते मध्यम प्रतीच्या जमिनीत पाण्याच्या १३ ते १५ पाळ्या द्याव्या लागतात. शिफारशीत मात्रेपेक्षा कमी पाणी पिकास मिळाल्यास कंदांची योग्य वाढ होत नाही. प्रक्रियेनंतर अशा हळकुंडांचा रंग फिका पडतो, चमक घटते. परिणामी विक्रीवेळी कमी दर मिळतो.

फुलांचे दांडे न काढणे : शाकीय वाढ पूर्ण झाल्यानंतर हळदीला फुले येण्यास सुरुवात होते. काही जातींना अधिक, तर काही जातींना कमी प्रमाणात फुलांचे दांडे येतात. हळदीला फुले येणे म्हणजे शाकीय वाढीचा कालावधी संपून कंद सुटण्यास सुरुवात झाल्याचे लक्षण आहे. फुलांचे दांडे तसेच झाडावर ठेवल्यास हळद पिकाला त्याचा कोणताही तोटा होत नाही. फुलांचे दांडे काढणे हे काम खर्चीक आहे. संशोधनातील प्रयोगांती असे निदर्शनास आले आहे, की हळदीवर फुलांचे दांडे असल्यामुळे उत्पादनात कोणतीही घट येत नाही. तसेच फुलांचे दांडे येणे ही न संपणारी क्रिया आहे. एकदा जरी दांडे काढले, तरी ते नव्याने येतच राहतात. फुले काढताना हळद पिकाच्या खोडाला इजा झाली, तर त्या भागातून दुय्यम बुरशींचा शिरकाव पिकात होऊन कंदकुज रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. त्यामुळे हळद पिकास आलेली फुले तशीच राहू द्यावीत.

तण नियंत्रण : हळद पिकामध्ये शेणखताचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. त्यामुळे शेणखतातून तणांचे बी शेतात येते. अवकाळी पाऊस झाल्यास, हे तणांचे बी मोठ्या प्रमाणात उगवून येते. या तणांचे वेळीच नियंत्रण होणे गरजेचे असते. तणांच्या तीव्रतेनुसार मजुरांच्या मदतीने निंदणी करून घ्यावी. तणनाशक फवारणी करणे टाळावे. तणनाशकाची फवारणी केली तर हळद पिकाच्या शारीरिक क्रियांवर विपरीत परिणाम होतो. तसेच उत्पादनात घट येण्याची शक्यता असते.




### महत्वाच्या घटना

१२७१ : कुबलई खान यांनी साम्राज्याचे नाव युआन करून राजवंश सुरू केले.
१७७७ : अमेरिकेत पहिले थँक्सगिव्हिंग साजरे करण्यात आले.
१७८७ : न्यू जर्सी हा अमेरिकेचे संविधान स्वीकार करणारा तिसरा देश बनला.
१८३३ : रशियन साम्राज्याचे राष्ट्रगीत गॉड सेव्ह द झार! हे पहिल्यांदा गायले गेले
१९१६ : पहिल्या विश्व युद्धात वेरदून ला झालेल्या लढाई मध्ये फ्रांस ने जर्मनी ला हरविले.
१९३५ : श्रीलंकेत 'लंका सम समाज पार्टी'ची स्थापना
१९४५ : उरुग्वे हा देश संयुक्त राष्ट्र संघटनेचा सदस्य बनला.
१९५६ : जपान ने संयुक्त राष्ट्र संघाचे सदसत्व स्वीकारले.
१९५८ : जगातील पहिले संचार उपग्रह प्रोजेक्ट स्कोर प्रक्षेपित करण्यात आले.
१९६९ : इंग्लंड ने मृत्यू दंडाची शिक्षा समाप्त केली.
१९७८ : डॉमिनिकाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९८८ : ऑस्ट्रेलिया महिलाक्रिकेटसंघाने इंग्लंड ला ८ विकेट ने हरवून लगातार तिसरा वर्ल्ड कप स्वतःच्या नावावर केला.
१९८९ : सव्यसाची मुकर्जी यांनी भारताचे २० वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९५ : अहिंसक मार्गाने सामाजिक, आर्थिक व राजकीय परिवर्तनासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल पहिला आंतरराष्ट्रीय गांधी शांतता पुरस्कार टांझानियाचे माजी अध्यक्ष ज्यूलिअस न्येरेरे यांना जाहीर.
२००६ : संयुक्त अरब अमिरातींमध्ये प्रथमच निवडणूका घेण्यात आल्या.
२००७ : जपान ने इंटरसेप्टर मिसाइल ची चाचणी केली.
२००८ : ब्रह्मोस सुपरसोनिक क्रूज मिसाइल चे यशस्वी रित्या प्रक्षेपण.
२०१४ : वजनाने सगळ्यात भारी रॉकेट जीएसएलवी मार्क-३ चे यशस्वी प्रक्षेपण.
२०१६ : इंडोनेशियन हवाई दलाचे वाहतूक विमान पापुआ मधील दुर्गम भागात प्रशिक्षण व्यायाम करताना डोंगरावर क्रॅश झाले, त्यात विमानातील सर्व जण ठार झाले.
२०१६ : भारतीय ज्युनिअर हॉकी टीम ने बेल्जियम ला हरवून जुनिअर वर्ल्ड हॉकी कप जिंकला.
२०१७ : राष्ट्रकुल कुस्ती स्पर्धेमध्ये भारताने ३० पैकी २९ सुवर्ण पदक जिंकले होते.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६२० : हेन्रिच रॉथ - जर्मनीतील संस्कृत विद्वान आणि धर्मप्रसारक (मृत्यू: २० जून १६६८)
१७५६ : छत्तीसगढ चे सुप्रसिद्ध संत गुरु घासीदास यांचा जन्म.
१८५६ : सर जे. जे. थॉमसन - इलेक्ट्रॉनच्या शोधाबद्दल १९०७ चे नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ३० ऑगस्ट १९४०)
१८८७ : भिखारी ठाकूर - भोजपुरी भाषेचे 'शेक्सपिअर' (मृत्यू: १० जुलै १९७१)
१८७८ : जोसेफ स्टालिन - सोविएत रशियाचे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ५ मार्च १९५३)
१८९० : ई. एच. आर्मस्ट्राँग एफ. एम. रेडिओचे संशोधक (मृत्यू: ३१ जानेवारी १९५४)
१९२४ : देशाचे १९ वे मुख्य न्यायाधीश एंगेल्गुप्पे सीतामा वेंकटारामिया यांचा जन्म.
१९५५ : विजय मल्ल्या - भारतीय उद्योगपती
१९६१ : माजी क्रिकेटपटू लालचंद राजपूत यांचा जन्म.
१९६३ : ब्रॅड पिट - अमेरिकन अभिनेता व निर्माता
१९७१ : बरखा दत्त - पत्रकार
१९७१ : अरांताक्सा सँचेझ व्हिकारिओ - स्पॅनिश लॉन टेनिस खेळाडू
१९९२ : भारताचे कबड्डी खेळाडू काशिलिंग अडके यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२९ : जीन बाप्टिस्टे लॅमार्क - फ्रेंच शास्त्रज्ञ (जन्म: १ ऑगस्ट १७४४)
१९२० : प्रसिद्ध चित्रकार सदानंद बकरे यांचे निधन.
१९७१ : भारतीय निबंधकार पदुमलाल पुन्नालाल बक्षी यांचे निधन.
१९७३ : भारतीय-पाकिस्तानी धर्मगुरू आणि तत्त्वज्ञ अल्लामाह रशीद तुराबी यांचे निधन. (जन्म: ९ जुलै १९०८)
१९८० : अलेक्सी कोसिजीन - रशियाचे पंतप्रधान (जन्म: २० फेब्रुवारी १९०४)
१९८० : लोकसभेचे सदस्य मुकुट बिहारी लाल भार्गव यांचे निधन.
१९९३ : राजा बारगीर - चित्रपट : दिग्दर्शक. 'सुखाचे सोबती' (१९५८), 'बोलकी बाहुली' (१९६१), 'देवा तुझी सोन्याची जेजुरी' (१९६७), 'मानाचा मुजरा' (१९६९), 'करावं तसं भरावं' (१९७५), 'दीड शहाणे' (१९७९), 'ठकास महाठक' (१९८४), 'गडबड घोटाळा' (१९८६), 'तुझी माझी जमली जोडी' (१९९०) अशा सुमारे नव्वद मराठी व हिन्दी चित्रपटांचे दिग्दर्शन त्यांनी केले.
१९९५ : कमलाकरबुवा औरंगाबादकर - राष्ट्रीय कीर्तनकार.
२००० : मुरलीधर गोपाळ तथा मु. गो. गुळवणी इतिहास संशोधक, वैदिक संस्कृतीचे अभ्यासक.
२००४ : विजय हजारे - क्रिकेटपटू (जन्म: ११ मार्च १९१५)
२०११ : चेक रिपब्लिकचे पहिले अध्यक्ष वाक्लाव हेवल यांचे निधन. (जन्म: ५ ऑक्टोबर १९३६).

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# यशवंतराव आंबेडकर बौद्धाचार्यांचे जनक व चैत्यभूमीचे शिल्पकार होते-बनकर

अंबड । प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील ताडहदगाव येथे एक दिवशीय समता सैनिक दलाचे प्रशिक्षण शिबिर संपन्न एक दिवशी य समता दलाचे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. सुरुवातीस यशवंतराव तथा भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्ताने त्यांना अभिवादन करण्यात आले .कार्यक्रमाचे उद्घाटन जालना जिल्हा पूर्व भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष आयुष्यमान महिंद्र बनकर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्ह्याचे सरचिटणीस आयुष्यमान भास्करराव साळवे यांनी उत्कृष्टपणे केले. समता सैनिक दलास प्रशिक्षण देण्यासाठी जालन्याहून आलेले लेफ्टनंट कर्नल कुणाल दहिवले उपस्थित होते, त्यांनी आपले विचार व्यक्त करताना समता सैनिक दलाचा पूर्ण इतिहास उत्कृष्टरित्या सर्वांना समजून सांगितला.

सैनिकास अनुशासना विषयक मार्गदर्शन केले. या शिबिरात १३ पुरुषांनी समता सैनिक दलात सहभाग घेतला होता. प्रथम समता सैनिक दलाच्या ध्वजारोहण करून मानवंदना दिली या कार्यक्रमाकरिता जालना जिल्हा महिला विभागाचे अध्यक्ष ज्योतीताई खरात यांनी मार्गदर्शन केले. जालना जिल्हा कोषाध्यक्ष सखाराम कोळे कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभा अंबड तालुक्याचे अध्यक्ष आयुष्यमान उत्तमराव येडे



होते. याप्रसंगी तालुका सरचिटणीस तथा त्वचा तज्ञ डॉक्टर राहुल बागुल, तालुका संरक्षण उपाध्यक्ष विनोद जाधव, संरक्षण सचिव विशाल रामदास वाढवे, बोदाचार्य तथा जिल्हा संस्कार सचिव भीमराव बनसोडे उपस्थित होते.या कार्यक्रमास मौजे ताड हदगाव येथील सरपंच आयु. शारदाताई वाघमारे उपस्थित होत्या. घनसावंगी तालुका अध्यक्ष राजकुमार खरात सुद्धा उपस्थित होते .आयुष्यमान भावनाताई दिलपाक ,सुभाष पाराजी जाधव तळेगाव ,अरुण नारायण खंडागळे पानेवाडी, बौद्धाचार्य हिवाळे सचिन मानेपुरी यांची उपस्थिती होती .कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयुष्यमान प्रकाश जी वाघमारे, एकनाथ वाघमारे, प्रकाश ससाने ,सर्जेराव ससाने, बाबासाहेब वाघमारे, विकास वाघमारे, विनोद ससाने, नितीन ससाने, विशाल ससाने ,सुजल वाघमारे, विशाल खळगे, नानासाहेब वाघमारे, रवी ससाने तथा समस्त बोध उपासक उपासिका ताडगाव यांनी परिश्रम घेतले. सरनातय गाथा ने कार्यक्रमाची सांगता झाली.

## एपीआय प्रल्हाद गीते यांनी खुनाचा गुन्हा दडपला

### अधिकाराचा गैरवापर, आर्थिक व्यवहार, महानिरीक्षकांकडे तक्रार

अहिल्यानगरा । प्रतिनिधी

नगर तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांनी अधिकाराचा गैरवापर करत आर्थिक व्यवहाराने खुनाचा गुन्हा दडपला असल्याचा आरोप साकत येथील सामाजिक कार्यकर्ता सोमनाथ राजाराम चितळकर यांनी केला आहे. याबात त्यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र यांच्याकडे निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, ६ मार्च २०२५ रोजी आरणगाव येथील मिठू कार्तिक दत्त यांचा फरसाण दुकानाच्या मालकासोबत वाद झाला. या वादातून दुकान मालक भाऊसाहेब विश्वनाथ नांगरे यांनी मिठू दत्त यांच्या डोक्यावर आणि तोंडावर हातोड्याने हल्ला केला, ज्यात ते गंभीर जखमी झाले. त्यांना सुरुवातीला स्थानिक रुग्णालयात दाखल केले असले तरी प्रकृती बिकट होत गेली आणि २० मार्च रोजी त्यांना पुणे येथे हलविण्यात आले.

अखेरीस २३ मार्च २०२५ रोजी त्यांचा मृत्यू झाला. मारहाणीत वापरलेला हातोडा देखील पोलिसांनी ताब्यात घेतला होता. मात्र खुनाचा गुन्हा दडपत अधिकाराचा गैरवापर करत आरोपींशी आर्थिक व्यवहार करत पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केल्याचा आरोप निवेदनात सामाजिक कार्यकर्त्य सोमनाथ राजाराम चितळकर यांनी केला आहे. तक्रार दिल्याचा रोष व्यक्त करत पोलीस निरीक्षक गीते यांनी ११ नोव्हेंबर रोजी शासकीय वाहन व चालकासह गोवर्धन राजेंद्र मिठापिल्ली यांच्या घरी अनधिकृत प्रवेश करून शिवीगाळ व दमदाटी केली. याप्रकरणी गोवर्धन मिठापिल्ली यांनीही पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांच्याकडे स्वतंत्र तक्रार दाखल केली असून, घटनेचा व्हिडिओ पुरावा देखील सादर केल्याची माहिती चितळकर यांनी दिली आहे. सदर प्रकरणाचा व्हिसेरा अहवाल प्राप्त झालेला असतानाही तो जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवला गेला. फक्त अकस्मात मृत्यूची नोंद केली गेली. तपासाचे कामकाज देखल एपीआय गीते यांनी आपल्या मुठीत ठेवले. तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील एका कर्मचाऱ्याच्या मध्यस्थीने गुन्हा दडपण्याची दहा लाखात डील केल्याचा आरोपही चितळकर यांनी केला आहे.

# महाविकास आघाडीच्या जागावाटपाचे घोडे अडकले

## काँग्रेस, शिवेसना ठाकरे गटाच्या मुलाखती पूर्ण

अहिल्यानगर । प्रतिनिधी

मनपा निवडणुकीसाठी महायुतीचा निर्णय अंतिम टप्प्यात असताना दुसरीकडे शिवसेना (उबाठा), काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) यांच्यात आघाडीचा निर्णय झाला असला तरी जागावाटप न झाल्याने घोडे अडले आहे. ठाकरे गटाकडून खा. लंके यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असून, अद्याप यावर निर्णय झाला नाही. काँग्रेसने महाविकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूकांना सामोरे जाणार असल्याचे सांगून एक ते दोन दिवसांत जागावाटप होईल, असे सांगितले आहे. त्यातच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या मुलाखती रविवारी दि.२१ डिसेंबर रोजी होणार असून, मुलाखतीनंतर जागावाटपाचा निर्णय होणार का? याकडे लक्ष लागले आहे.

महानगरपालिका निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याअगोदर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने सर्वात अगोदर इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्यानंतर शिवसेना शिंदे गट, शिवसेना उबाठा, काँग्रेस व भाजपच्या मुलाखती पार पडल्या आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून २१ डिसेंबरला दुपारी राष्ट्रवादी भवन कार्यालयात इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती होणार आहे. महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेस, शिवसेना उबाठा पक्षाने इच्छुकांच्या मुलाखती यापूवच घेतल्या आहेत. याबाबत दोन्ही पक्षाने शरदचंद्र पवार गटाला जागावाटपाचा प्रस्ताव पाठविला असून, खा.नीलेश लंके यांच्यासोबतच्या बैठकीत यावर अंतिम निर्णय होणार आहे. मात्र, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या अजून मुलाखती बाकी असल्याने महाविकास आघाडीतील जागावाटपाचा पेच कधी सुटणार असा प्रश्न उमेदवारांसह कार्यकर्त्यांना पडला आहे. मुंबईत शिवसेना व मनसेची युती होणार असल्याने नगरमध्ये शिवसेनेची मनसेसोबत चर्चा सुरू आहे. उद्या ते महाविकास आघाडीत आल्यास जागावाटपाचे गणित बिघडू शकते. रकाँग्रेस व शिवसेना ठाकरे गटाच्या मुलाखती पूर्ण झाल्या आहेत. या दोन्ही पक्षांकडून जागावाटपाबाबत खा. नीलेश लंके यांच्याकडे पाठपुरावा सुरू आहे. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या मुलाखती या २१ तारखेला होणार आहे. तर महापालिका निवडणुकीसाठी २३ डिसेंबरपासून अर्ज भरण्यास सुरुवात होणार आहे. त्यामुळे जागावाटपाचा निर्णय कधी होणार, जागेवाटपाचे सूत्र कसे असणार, उमेदवार कधी अर्ज दाखल करणार, असे एक ना अनेक प्रश्न इच्छुकांसह कार्यकर्त्यांना पडले आहे.



**जालना : विविध मागणी संदर्भात जिल्हाधिकारी आशिया मित्तल यांचा भेट घेऊन तसेच सत्कार करण्यात आला यावेळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष हस्तीमल बंब, सतीश पंच, मनोज बंब. वैशाली बंब, आनंद बंब, रूपाली बंब. नरेंद्र जोगड आदी.**

## दहा लाखाचं सोन्या चांदी लुटल्याप्रकरणी आरोपी १२ तासात पकडला

जालना । प्रतिनिधी

शेवली पोलीस ठाणे येथील जबरी चोरीच्या गुन्हयातील आरोपींचा शोध घेवून गुन्हा उघडकिस करण्याबाबत सेवली पोलीस ठाणे हद्दीतील नेर ते पाहेगाव रोडवरील पोखरी पाटीजवळ दिनांक १४/१२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा सुमारास फिर्यादी संतोष बळीराम बोंद्रे रा.नेर ता.जि. जालना हे मोटार सायकलने नेर येथुन पाहेगाव मार्गे पाथरूड येथील त्यांचे सोन्याचे दुकानामध्ये जात असतांना यातील आरोपीनी त्यांना मागुन मोटार सायकलवर येवून धडक दिली व खाली पाडले त्यानंतर मागे बसलेल्या आरोपीने त्यांना चाकुने दुखापत करण्याची धमकी देवून फिर्यादीचे जवळ असलेली हिरव्या रंगाची बंग ज्यात १०,५०,०००/- (दहा लाख पन्नास हजार रुपये) रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने असलेली हिसकावून नेली म्हणुन अज्ञात आरोपीविरुद्ध सेवली पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १६२/२०२५ भा न्या से कलम ३०९(४),३(५) प्रमाणे दि. १४/१२/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता सदर गुन्ह्याचे तपासादरम्यान अमोल इंदल राठोड वय ३५ वर्षे रा. उखळी ता.जि. जालना २) प्रविण विनायक जाधव वय २२ वर्षे रा. राजेगाव ता. माजलगाव जि.बीड ह.मु.उखळो ता.जि.जालना यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे विचारपूस करता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे मान्य केले असून गुन्ह्यात चोरीस गेलेला १०,५०,०००/-(दहा लाख पन्नास हजार रुपये) किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने असा मुद्देमाल बारा तासाच्या आत हस्तगत केला आहे.सदरची कारवाई श्री अजयकुमार बन्सल, पोलीस अधिक्षक , श्री आयुष नोपाणी, अपर पोलीस अधिक्षक , श्री रामेश्वर रेंगे उप-विभागीय पोलीस अधिकारी परतूर उप-विभाग यांचे मार्गदर्शनाखाली योगेश खटकळ सहायक पोलीस निरीक्षक प्रभारी अधिकारी सेवली, पोउनि सलीम शेख, पोह/३१० सुभाष राठोड, पोना २६० पाईकराव, प्रल्हाद चिरफरे, संजय उघडे, विजय जुमडे, पांडुरंग लिंबाळकर, अशोक दुभळकर सर्व नेम. पोलीस ठाणे सेवली आणि ३४६/खरात, ४२० पाचरणे नेम. मौजपूरी पोलीस ठाणे यांनी केली आहे.

## सरपंच प्रभाकर बोरुडे तिसऱ्या अपत्याच्या कारणाने सरपंच पदावरुन पायउतार

मंठा । प्रतिनिधी

टाकळखोपा तालुका मंठा येथील सरपंच प्रभाकर बन्सी बोरुडे यांना १२ सप्टेंबर २००१ नंतर तिसरे अपत्य असल्याचे सिद्ध झाल्याने जिल्हाधिकारी जालना यांनी त्यांचे सरपंच व सदस्य पद रद्द ठरविले आहे. यासंदर्भात अर्जदार पांडुरंग अंकुश चाटे रा. टाकळखोपा यांनी जिल्हाधिकारी जालना यांच्या न्यायालयात सरपंच प्रभाकर बोरुडे यांना तिसरे अपत्य असल्याने त्यांचे सरपंच पद अपात्र ठरवावे म्हणून मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४ (ज - १) सह कलम १६ ( २ ) प्रमाणे विवाद अर्ज दाखल केला होता.

या अर्जावर सुनावणी होऊन दोन्ही पक्षकारांना बाजू मांडण्याची संधी देण्यात टाकळखोपा ग्रामपंचायत मध्ये प्रभाकर बन्सी बोरुडे हे थेट जनतेतून सरपंच म्हणून निवडून आले असून ते ग्रामपंचायत सदस्य व सरपंच म्हणून कार्यरत असून शासनाच्या नियमानुसार त्यांना तीन अपत्य असल्यामुळे त्यांनी कायद्याच्या तरतुदीचे उल्लंघन केल्याचे जिल्हाधिकारी जालना यांनी दिलेल्या आदेशात म्हटले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी सरपंच प्रभाकर बोरुडे यांचे पद अपात्र ठरविले असून याबाबतचे आदेश काढण्यात आलेले आहेत. अर्जदाराच्यावतीने ॲड. एस एस काळबांडे यांनी काम पाहिले.

## गुटक्याच्या ११ पानटपऱ्यावर पोलीस प्रशासनाची धडाकेबाज कारवाई

### जिल्हा माहिती कार्यालयात फोटोग्राफर पद रिक्त

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्हा माहिती कार्यालय येथे बरेच वर्षापासून फोटोग्राफर पद रिक्त असल्यामुळे जिल्हा प्रशासन पोलीस प्रशासन आरोग्य प्रशासन विभागाचे फोटो देण्यासाठी फार मोठी अडचण निर्माण झाली आहे यासंदर्भात फोटोग्राफर पद तत्काळ भरण्यात यावे अशी पण मागणी होत आहे.

जालना जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक पंकज जाधव, सहा. पोलीस उपनिरिक्षक योगेश उबाळे तसेच अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील मंठा रोड येथे अवैधरित्या गुटखा, तंबाखु, मावा, जर्दा, खर्रा आणि सुट्ट्टे सिगारेट इत्यादींची विक्री करणाऱ्या तसेच तंबाखु नियंत्रण कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती व पानटपरीधारकांवर कोटपा-२००३ कायदा अंतर्गत जिल्हा तंबाखु नियंत्रण अंमलबजावणी पथकाद्वारे छापे टाकण्यात आले. यामध्ये कायद्याअंतर्गत विविध कलमानुसार एकुण ११ पानटप-यांवर कारवाई करुन ४ हजार ९०० रुपयांचा दंड वसुल करण्यात आला. ही कारवाई संपुर्ण जिल्हाभरात यापुढेही जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे. तरी पानटपरी धारकांनी अवैधरित्या कुठल्याही तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थाची विक्री करु नये. असे आवाहन करण्यात आले आहे. ही कार्यवाही स्थानिक गुन्हे शाखेचे एस.पी. तनपुरे, कैलास खार्डे, राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा सल्लागार डॉ. संदिप गोरे, समुपदेशक सोनाजी भुतेकर, सामाजिक कार्यकर्त्या सुनंदा कोरडे व ग्रामीण विकास संस्थेचे विभागीय व्यवस्थापक मंगेश गायकवाड यांच्याद्वारे करण्यात आली. असे जिल्हा शल्यचिकित्सक, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# नगरसेवक व्हायचं, किती खर्च करणार

## इच्छुकांकडून लाखो, कोटीचे उड्डाणे, राजकीय पक्षांच्या मुलाखतीत विचारले विविध प्रश्न

अहिल्यानगर । प्रतिनिधी

तुम्हाला नगरसेवक व्हायंच आहे तर तुम्ही आतापर्यंत काय काय विकासकामे केली, यापूव कोणत्या पक्षात होतात, पक्षासाठी किती योगदान दिले, तुम्हाला तिकीट दिल्यास तुम्ही किती खर्च करणार असे विविध प्रश्न इच्छुक उमेदवारांना राजकीय पक्षांनी घेतलेल्या मुलाखतीत विचारण्यात आले. यात सर्वात महत्वाचा प्रश्न आर्थिक खर्चाचा असल्याने अनेक उमेदवारांनी तिकीट मिळविण्यासाठी लाखो, कोटीचा खर्च करण्याचा शब्द नेत्यांना दिला आहे.

इच्छुकांकडून नगरसेवक होण्यासाठी लाखो, कोटीचे आकडे पाहता यावषच्या निवडणुकीत प्रत्येक प्रभागात कोट्यवधी रुपयांचा चुराडा होणार असल्याचे दिसून येत आहे. महापालिकेच्या १७ प्रभागांसाठी ६८ नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. सुमारे तीन लाख सात हजार नऊ मतदार लोकशाहीचा पवित्रा हक्क बजावत मतदान करणार आहे. १५ जानेवारीला मतदान होणार असून, निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्याने उमेदवार कामाला लागले आहे.

दुसरीकडे मनपा निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी मुलाखती घेतल्या आहे. त्यात भाजप, राष्ट्रवादी व शिवसेना शिंदे, उबाठा गटाकडून इच्छुकांची गद मोठ्या प्रमाणात दिसून आली आहे. या पक्षाकडून नुकताच मुलाखतीचा कार्यक्रम पार पडला. तिकीट मिळविण्यासाठी उमेदवारांनी जोरदार शक्तीप्रदर्शन (भाजप वगळून) केले होते. यावेळी इच्छुकांना पक्षाच्या नेतेमंडळीकडून मुलाखती दरम्यान विविध प्रश्न विचारण्यात आले. पक्षाची निष्ठा, आतापर्यंत केलेली विकासकामे, यापूव कोणत्या पक्षात होता, खर्च करण्याची तयारी असे विविध प्रश्नांची सरबत्ती करण्यात आली. खर्चाचा प्रश्न महत्वाचा असल्याने यावर अधिक भर होता.

महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना रंगणार आहे. यंदाची निवडणूक काँटे की टक्कर असणार आहे. त्यामुळे उमेदवार खर्चात कमी पडायला नको म्हणून उमेदवारांची आर्थिक ताकद अजमावून पाहण्यासाठी त्यांना खर्चाची तयारी विचारण्यात आली. लाख, कोटी असे आकडे ऐकून मुलाखत घेणाऱ्यांना हायसे वाटले. त्यामुळे होऊ द्या खर्च, असे जरी वाटल असले तरी निवडणूक आयोगाने उमेदवारांना खर्चाची मर्यादा घालून दिल्याने त्यांच्यावर लक्ष असणार आहे. त्यामुळे उमेदवारांकडून चोरी चोरी चुपके चुपकेवर भर दिला जाणार आहे. राज्यातील महानगरपालिकेच्या निवडणुका बहुतांश ठिकाणी महायुती म्हणून लढण्याचा निर्णय वरिष्ठ नेत्यांनी घेतला आहे.

अहिल्यानगर महापालिका निवडणूक महायुती म्हणून एकत्रित लढण्याबाबत चर्चा करणार आहे. महायुती म्हणून निवडणूकांना सामोरे जाण्यासाठी आमचा प्रयत्न राहणार असल्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले आहे. त्यामुळे महापालिकेत भाजप व राष्ट्रवादी स्वबळावर लढण्याची शक्यता धूसर झाली आहे. मात्र, याचा निर्णय कधी होणार याकडे दोन्ही पक्षांतील उमेदवारांचे लक्ष लागले आहे

## दोन बालकांचा विहिरीत आढळला मृतदेह

### आईची इन्स्टाग्रामवर वरील पोस्ट चर्चेत

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अकोले तालुक्यातील विरगाव येथे दोन चिमुकल्यांचा विहिरीत पडून दुर्दैवी अंत झाला. वडिलांचा एका अपघातात सात महिन्यांपूर्वी मृत्यू झाला होता. आता दोन मुलांच्या मृत्यूने हा घातपात असल्याचा संशय नातेवाइकांनी व्यक्त केला आहे.

अकोले तालुक्यातील मौजे दिगंबर येथील काही दिवसांपूर्वी अज्ञात वाहनाने धडक दिल्याने पोपट मेंगाळ यांचा मृत्यू झाला. त्यांची पत्नी विरगाव येथे माहेरी राहते. रविवारी (दि. १४) सायंकाळी घरापासून पन्नास मीटर अंतरावर असलेल्या विहिरीत श्रेया पोपट मेंगाळ (वय. अडीच वर्षे) पीयूष पोपट मेंगाळ (वय. साडेसात महिने) असे दोघे विहिरीत पडल्याचे कळाले.

परिसरातील नागरिक येईपर्यंत काही काळ लोटला. रात्री उशिरा श्रेया हिचा मृतदेह मिळाला तर सकाळी पीयूष या चा मृतदेह सापडला. कोतूळ येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले.

पोलिस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक विनोद खांडबहाले घटनेचा तपास करीत आहेत. श्रेया अडीच वर्षांची होती. शिवाय ती कुपोषित असल्याने ती भावाला घेऊन कशी गेली. शिवाय मुलांच्या आईने इन्स्टाग्रामवर काल जीवनाचा कंटाळा आला आता जगणे नाही. अशी पोस्टही केली होती. त्यामुळे घातपाताचा संशय बळावतो आहे, असे नातेवाइकांचे म्हणणे आहे

# महसूल कर्मचाऱ्यांचा अन्यायाविरोधात एल्गार
# उद्यापासून बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा

बीड । प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य महसूल अधिकारी व कर्मचारी समन्वय महासंघ , जिल्हा शाखा बीड यांच्या वतीने महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर होत असलेल्या एकतर्फी , अन्यायकारक निलंबन कारवाई , विभागातील प्रलंबित आर्थिक व सेवाविषयक मागण्या , तसेच नैसर्गिक आपत्ती व निवडणूक काळातील अतिरिक्त कामकाज असूनही संरक्षण न मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर १९ डिसेंबर २०२५ पासून बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे . यासंदर्भातील निवेदन आज जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना देण्यात आले .**

निवेदन सादर , तीव्र नाराजी व्यक्त : जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत शासनाकडे आपली भूमिका ठामपणे मांडली . महसूल विभाग हा राज्य प्रशासनाचा कणा असून सामान्य जनतेशी थेट संपर्क असलेला विभाग आहे . मात्र अलिकडच्या काळात केवळ महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांनाच जबाबदार धरून निलंबन , फौजदारी कारवाई व चौकशीचे सत्र सुरू असल्याने विभागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे , अशी तीव्र भावना व्यक्त करण्यात आली .

निलंबन सत्राला विरोध : निवेदनात नमूद करण्यात आले आहे की , महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार बेकायदेशीर गौण खनिज उत्खनन , वाहतूक व चोरी रोखण्याची जबाबदारी केवळ महसूल विभागाची नसून पोलीस व परिवहन विभागाचीही संयुक्त जबाबदारी आहे . मात्र प्रत्यक्षात कारवाई होताना सर्व दोष महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांवर टाकले जात आहेत . परिणामी न्यायालयीन निर्देश , नैसर्गिक न्यायाची तत्त्वे व प्रशासकीय नियम डावलून एकतर्फी निलंबने केली जात असल्याचा आरोप महासंघाने केला आहे.



प्रमुख मागण्या स्पष्ट : महासंघाने शासनासमोर प्रमुख मागण्या मांडल्या आहेत . त्यामध्ये १२ व १३ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर करण्यात आलेल्या निलंबन आदेशांचा पुनर्विचार व रद्दबातल निर्णय , चौकशी पूर्ण होईपर्यंत पूर्ववत पदस्थापना , महसूल विभागातील नायब तहसीलदार , मंडळ अधिकारी , तलाठी , महसूल सहाय्यक यांच्या वेतनश्रेणी व ग्रेड पे सुधारणे , राज्यातील महसूल सेवक संवर्गाच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित मागण्यांना तातडीने मंजुरी देणे , तसेच निवडणूक व आपत्ती काळातील कामकाजासाठी संरक्षणात्मक धोरण राबविणे यांचा समावेश आहे . कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता : महासंघाने स्पष्ट केले आहे की , मागण्या मान्य न झाल्यास १९ डिसेंबर २०२५ पासून संपूर्ण महाराष्ट्रात महसूल विभागाचा बेमुदत कामबंद आंदोलनात सहभाग राहील . त्यामुळे जमीन नोंदणी , फेरफार , सातबारा , दाखले , आपत्ती मदत , पिक पाहणी आदी कामकाज ठप्प होण्याची शक्यता असून त्याची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील , असा इशारा देण्यात आला आहे.

### निवडणूक आणि नैसर्गिक आपत्ती वगळले

महसूल अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या या बेमुदत कामबंद आंदोलनामधून निवडणूकीचे कामकाज आणि नैसर्गिक आपत्ती अनुदान वाटप आदी कार्यक्रम वगळण्यात आले असून यावर बहिष्कार असणार नाही.

संवादाची मागणी : महसूल अधिकारी व कर्मचारी यांनी संघर्ष नको तर संवाद हवा अशी भूमिका घेत शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करून तातडीने तोडगा काढावा , अन्यथा आंदोलन अपरिहार्य असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे . शासनाने वेळीच सकारात्मक निर्णय घेतल्यास जनतेचे हित आणि प्रशासनाची विश्वासार्हता अबाधित राहील , अशी अपेक्षाही महासंघाने व्यक्त केली आहे . निवेदन देताना अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , उपजिल्हाधिकारी मनोज घोडे , कविता जाधव , शिवकुमार स्वामी , प्रभोदय मुळे , शैलेश सूर्यवंशी , तहसीलदार चंद्रकांत शेळके , डी सी मेंडके , नरेंद्र कुलकर्णी , विनोद रणनवरे , विलास तरंगे , राकेश गिड्डे नायब तहसीलदार प्रशांत जाधवर व विविध संघटनेचे पदाधिकारी यात महादेव चौरे , पुरुषोत्तम आंधळे , अरविंद राऊत आदी उपस्थित होते .

## ढाळेवाडीत बिबट्याची पुन्हा दहशत
## शेळी ठार, तात्काळ उपाययोजनांची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील ढाळेवाडी परिसरात बिबट्याचा वावर पुन्हा एकदा समोर आला असून, यामुळे शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. १५ डिसेंबर रोजी घडलेल्या एका घटनेत, ढाळेवाडी येथील शेतकरी शामराव रामभाऊ वाळेकर यांच्या शेतातील एका शेळीवर दबा धरून बसलेल्या बिबट्याने हल्ला केला आणि तिला ठार केले.

घटनेचा तपशील: शामराव वाळेकर हे आपल्या शेळ्यांना चारण्यासाठी शेतात गेले होते. त्याच वेळी, जवळच दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक एका शेळीवर झडप घातली. हा थरार पाहून घाबरलेल्या वाळेकर यांनी त्वरित गावाकडे धाव घेतली आणि गावकऱ्यांना या घटनेची माहिती दिली. मात्र, गावकरी घटनास्थळी पोहोचेपर्यंत बिबट्याने शेळीचा फडशा पाडला होता आणि तेथून पळ काढला होता.

आमदार धसांकडून वनविभागाला आदेश: पान ३ वर



## चोरीस गेलेले व हरवलेले मोबाईल नागरिकांना केले परत
### बीड शहर पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

बीड । प्रतिनिधी

बीड शहर पोलीस दलाने चोरीस गेलेले व हरवलेले मोबाईल शोधून काढून ते मूळ मालकांकडे सुपूर्द करत नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे. या कारवाईत एकूण १८ मोबाईल फोन नागरिकांना परत देण्यात आले आहेत. सदरील उपक्रमाची संकल्पना व प्रेरणा बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांची असून, त्यांच्या मार्गदर्शनानुसार हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला.



या संपूर्ण कामगिरीसाठी पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार व पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली. या मोहिमेत सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. दिलीप खेडकर, पोलीस अंमलदार श्री. सुषेण उगले व पोलीस अंमलदार श्री. सय्यद शहनशहा यांनी प्रत्यक्ष सहभाग घेऊन विशेष परिश्रम घेतले. सखोल तपास, तांत्रिक विश्लेषण व सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे सदरील कामगिरी होऊ शकली. शोधून काढलेले मोबाईल पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर यांच्या हस्ते संबंधित नागरिकांना परत देण्यात आले. या कामगिरीमुळे नागरिकांचा पोलीस दलावरील विश्वास अधिक दृढ झाला असून, बीड पोलीस दल सदैव नागरिकांच्या सेवेत तत्पर असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

## स्व.झुंबरलाल खटोड प्रतिष्ठानतर्फे २५ वा राज्यस्तरीय कीर्तन महोत्सव ३१ डिसेंबर ते १० जानेवारी

बीड । प्रतिनिधी

गेल्या २४ वर्षांपासून बीड शहरात अध्यात्म, संस्कार व संतविचारांची पेरणी करणारे स्वर्गीय झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने यंदा २५ वा राज्यस्तरीय कीर्तन महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. हा अकरा दिवसीय भव्य महोत्सव ३१ डिसेंबर ते १० जानेवारी या कालावधीत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे संपन्न होणार आहे.

मावळत्या वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागत या संकल्पनेतून वैकुंठवासी भरत बुवा रामदासी यांनी सन २००४ मध्ये या कीर्तन महोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली. तेव्हापासून आजतागायत ही परंपरा अखंडपणे सुरू असून बीडकरांच्या प्रचंड प्रतिसादामुळे व आशीर्वादामुळे हा महोत्सव यंदा रौप्यमहोत्सवी वर्षात प्रवेश करत आहे.

यंदाच्या महोत्सवात वारकरी संप्रदायातील आठ कीर्तने तसेच संतांच्या जीवनावर आधारित संगीतमय ०४ संतचरित्र कथा सादर केल्या जाणार आहेत. या कार्यक्रमांसाठी महाराष्ट्रातील नामवंत सांप्रदायिक कीर्तनकार व कथाकार आपली सेवा देणार आहेत.हा महोत्सव दररोज सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत विविध सत्रांमध्ये होणार असून संपूर्ण कार्यक्रम सर्व भाविक भक्तांसाठी मोफत व खुला आहे.

तरी या अकरा दिवसीय राज्यस्तरीय कथा व कीर्तन महोत्सवाचा लाभ बीडकरांनी सहकुटुंब उपस्थित राहून घ्यावा, असे आवाहन स्वर्गीय झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## ई–पीक पाहणीसाठी समिती गठित

बीड । प्रतिनिधी

खरीप हंगाम २०२५ मध्ये विहित मुदतीत ई–पीक पाहणी नोंद न झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांची ऑफलाईन पाहणी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.

या समितीत उपविभागीय अधिकारी (अध्यक्ष), तहसीलदार, गटविकास अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांचा समावेश आहे.

ज्या शेतकऱ्यांची पीक नोंद विविध कारणांमुळे ७/१२ उताऱ्यावर आली नाही, त्यांच्या पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून फेरचौकशी करण्यात येणार असून याबाबतचा अहवाल दिनांक १५ जानेवारी २०२६ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात येणार आहे.सर्व उपविभागीय अधिकारी यांनी समितीच्या कामकाजाचा दररोज आढावा घेऊन दैनिक अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास व पणन विभागास सादर करावयाचा आहे. या अहवालाच्या आधारे पणन विभागाकडून पीक खरेदीबाबत पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात येणार आहे.सदर विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन सर्व संबंधितांनी तातडीने कार्यवाही करावी, असे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कळविले आहे

## लोकनेते गोपीनाथ मुंडेसाहेब जयंतीनिमित्त शैक्षणिक साहित्य, गणवेश व खाऊ वाटप

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील आदर्शगाव वंजारवाडी येथील छत्रपती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मातोश्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात लोकनेते गोपिनाथरावजी मुंडेसाहेब यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना मा. ॲड. श्री. सर्जेराव तात्या तांदळे यांनी विद्यार्थ्यांनी मुंडेसाहेबांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कठीण परिस्थितीतही धैर्याने मार्ग काढत उज्ज्वल भविष्य घडवावे, असे आवाहन केले. पिंपळाचे झाड खडकावरही ठाम उभे राहते; तसेच परिस्थिती कितीही कठीण असली तरी न डगमगता परिश्रमांची पराकाष्ठा करून यश मिळवावे, असे त्यांनी सांगितले.



जयंतीनिमित्त मा. ॲड. श्री. सर्जेराव तात्या तांदळे यांच्या वतीने आदर्शगाव वंजारवाडीचे सरपंच मा. श्री. वैजिनाथ नाना तांदळे, मा. श्री. देविदासजी नागरगोजे सर व इतर मान्यवरांच्या शुभहस्ते जि.प. प्राथमिक शाळा, अंगणवाडी व मातोश्री विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, गणवेश पान ३ वर

## विज कंपनीच्या गलथान कारभारामुळे मोगऱ्यात पाच एकर उस जळाला
### दोन वर्षात दोनदा जळाला उस; विजतार तुटल्याने लागली आग

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मोगरा येथील शेतकरी मोहन कल्याण कुलकर्णी यांचा तोडणीस आलेला उस विज वितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे विजतार तुटल्याने लागलेल्या आगीत जळाला आहे. दरम्यान दोन वर्षात दोनदा उस जळाल्याने शेतक–याचे मोठे नुकसान झाले आहे.

तालुक्यातील मोगरा येथील शेतकरी मोहन कल्याण कुलकर्णी यांची गट नं. ४ मध्ये शेती असुन त्यांचा पाच एकर उभा उस आहे. या उसाच्या शेतातुन विद्युत वाहिनी गेलेली असुन मागील वर्षी देखिल याच शेतक–याच्या शेतात आग लागली होती. याबाबत विज कंपनीस कळविले देखिल होते परंतु त्यांनी विजतार बदलली नाही. परिणामी जिर्ण झालेली विजतार तुटल्याने त्यांच्या उसाला आग लागली. शेतकरी मोहन कुलकर्णी व गावातील शेतक–यांनी ही आग विझविण्याचा प्रयत्न केला परंतु आग विझली नाही. यामध्ये संपूर्ण पाच एकर उस जळाल्याने शेतक–याचे प्रचंड नुकसान झाले असुन इतर ठिकाणी आग जावु नये याकरीता शेतक–यांनी शर्थीचे प्रयत्न केले. दरम्यान मागील वर्षी देखिल याच शेतक–याचा उस जळाला होता. याबाबत महावितरण कंपनीस वारंवार सांगुन देखिल दुर्लक्ष केल्याने पुन्हा यावर्षी उस जळाल्याची घटना घडली आहे. त्यामुळे कारखाने या उसाला तिस टक्के कमी भाव देतात. त्यामुळे शेतक–याचे नुकसान झाले आहे. दरम्यान हा प्रकार घडल्याने शेतक–यातुन संताप व्यक्त केला जात असुन नुकसान भरपाई द्यावी अन्यथा आंदोलनाचा आक्रमक पावित्रा घेण्याचा इशारा देखिल देण्यात आला आहे.



## श्रृंगेरीदेवीकडे जाणाऱ्या रस्त्यांची दुरावस्था
### दोन दिवसांत दुरुस्तीची मागणी, आंदोलनाचा इशारा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी – श्रृंगेरीदेवी व मुगगावश्रृंगेरीदेवी हे दोन्ही प्रमुख रस्ते गेल्या दोन वर्षांपासून अत्यंत दयनीय अवस्थेत असून त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता अशोक पोकळे (चिंचाळा) यांनी केली आहे. याबाबत त्यांनी दि. १७ डिसेंबर रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, आष्टी येथील कार्यकारी अभियंत्यांना निवेदन सादर केले आहे.

श्रृंगेरीदेवी येथील यात्रा ही तालुक्यातील सर्वात मोठी जत्रा असून यावर्षी पौष पौर्णिमेला दि. ५ जानेवारीपासून यात्रेला सुरुवात होणार आहे. अमावस्येपर्यंत सलग १५ दिवस चालणाऱ्या या यात्रेदरम्यान आष्टी, पाटोदा तालुक्यांसह राज्यभरातून लाखो भाविक देवीच्या दर्शनासाठी दाखल होतात. मात्र, सध्याच्या रस्त्यांच्या अवस्थेमुळे भाविक व स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



आष्टी व मुगगावकडून श्रृंगेरीदेवीकडे जाणाऱ्या मार्गांवर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून साईडपट्ट्या पूर्णपणे वाहून गेल्या आहेत. त्यामुळे दुचाकी, चारचाकी तसेच पायी जाणाऱ्या भाविकांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. आष्टीमुगगाव हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी व कंत्राटदारांसाठी ''चराईचे कुरण'' ठरत असल्याची तीव्र नाराजी ग्रामस्थांमध्ये असल्याचा आरोपही पोकळे यांनी केला आहे. नव्याने रस्ता झाल्यानंतर अवघ्या सहा महिन्यांतच पुन्हा खड्डे पडतात. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असून केवळ तात्पुरत्या स्वरूपात डागडुजी केली जाते; मात्र काही दिवसांतच रस्त्यांची अवस्था पूर्ववत होते, अशीही माहिती निवेदनात देण्यात आली आहे.

आगामी पान ३ वर

## ॲड.चंद्रकांत नवले यांनी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीचे रणसिंग फुंकले



बीड । प्रतिनिधी

शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत नवले यांनी शिवसेना पक्षाचे सचिव श्री. संजय मोरे यांच्या सुचनेनुसार गेवराई मतदार संघातील आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीची पूर्वतयारी म्हणून आज शिवसेना संपर्क कार्यालय गेवराई येथे सर्व पदाधिकारी यांची एकत्रित बैठक घेऊन निवडणुकीबाबत पुढील दिशा ठरवत अनेक ठराव संमत करून आणि सोशल मीडिया समिती, प्रचार साहित्य समिती, कायदे तज्ञ समिती अशा विविध समित्या गठीत करून होतकरू पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना संधी देऊन प्रत्येकाकडे जबाबदारी निश्चित केली आहे.

शिवाय प्रत्येक जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणामध्ये धर्मवीर आनंद दिघे नागरी सहायता कक्ष स्थापन करून परिसरातील नागरिकांना जास्तीत जास्त मदत करावी अशा सूचना केल्या तसेच संपूर्ण मतदारसंघांमध्ये लवकरच परिक्रमा करणार असल्याचे जाहीर करून पान ३ वर

## आज बीडमध्ये होणारी पुरुष महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा नियमबाह्य
### प्रा.जनार्दन शेळके यांनी स्वत:च्या स्वार्थासाठी खेळाडूंची दिशाभूल–प्रा.आगळे



बीड । प्रतिनिधी

शिवछत्रपती पुरस्कार घेणारे प्रा. जनार्दन शेळके यांनी बीड जिल्हा खो खो असोसिएशन अस्तित्वात असताना बोगस एमॅच्युअर खो–खो संघटना वेगळी स्थापन केली. या संघटनेच्या नावाखाली त्यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र खो–खो असोसिएशनचे अध्यक्ष, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्यासह बीडमध्ये ६१ वी पुरुष महिला राज्य अजिंक्यपद खो–खो स्पर्धेचे आयोजन करून खेळाडूंची देखील दिशाभूल केली आहे. त्यामुळे या राज्यस्तरीय खो–खो स्पर्धेवर बीड जिल्हा खो खो असोसिएशनचा बहिष्कार असून या गैरप्रकाराची चौकशी करून बोगस संस्था स्थापन करून त्यावर नियमबाह्य स्पर्धेचे आयोजन करणाऱ्या महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे अध्यक्ष तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी कायदेशीर कारवाई करावी अशी रोखठोक मागणी पत्रकार परिषदेमध्ये बीड जिल्हा खो खो असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा. तानाजी आगळे आणि सदस्य सौ. चित्रा आगळे यांनी केली आहे.

बीड येथील त्यांच्या निवासस्थानी गुरुवार दिनांक १७ डिसेंबर रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी बोगस स्थापन केलेल्या एमॅच्युअर खो खो संघटनेचे संस्थापक अध्यक्ष यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. ते म्हणाले की, बीड जिल्हात खो खो खेळाला एक वेगळा दर्जेदार इतिहास आहे. या खेळाच्या माध्यमातून मागील २५ वर्षांमध्ये अनेक खेळाडू राज्य, विद्यापीठ आणि राष्ट्रीय खेळाडू म्हणून तयार पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

गुरुवार दि.१८ डिसेंबर २०२५ | पान ७

# आचारसंहिता लागताच महापालिका ॲक्शन मोडवर; शहरातील अनधिकृत फ्लेक्सवर कारवाई



पिंपरी । प्रतिनिधी

**महापालिका सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा राज्य निवडणूक आयोगाने सोमवारी केली. त्यानंतर महापालिका प्रशासनाने आचारसंहितेचे पालन करण्यासाठी शहरात लागलेले फ्लेक्स, बॅनर काढायला सुरूवात केली आहे.मंगळवारी (दि. १६) दुपारी ३ वाजेपर्यंत ४ हजार ८१९ नियमबाह्य तसेच अनधिकृतपणे लावण्यात आलेले राजकीय फ्लेक्स, बॅनर्स, किऑस्क, स्टिकर्स, होर्डिंग, चिन्हे, ध्वज, फलक, भिंतीवरील राजकीय जाहिराती आदी बाबी हटविण्यात आल्या आहेत. महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या वतीने ही कारवाई सुरू करण्यात आली आहे.**

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना आणि आदेशांचे पालन करण्यासाठी महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. शहरातील प्रमुख चौक, मुख्य रस्ते, सार्वजनिक ठिकाणे तसेच शासकीय इमारतींच्या परिसरात लावण्यात आलेले अनधिकृत, नियमबाह्य जाहिरात फलक, फ्लेक्स आदी बाबी हटविण्याची मोहीम युद्धपातळीवर राबविण्यात येत आहे.ही कारवाई करताना संबंधित राजकीय पक्ष, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी महापालिकेला सहकार्य करावे, तसेच पुढील काळात कोणत्याही स्वरूपात आचारसंहितेचा भंग होईल असे साहित्य लावू नये, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

'निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यानंतर शहरात कुठेही राजकीय स्वरूपाचे जाहिरात फलक, होर्डिंग किंवा फ्लेक्स राहू नयेत, यासाठी कारवाई सुरू करण्यात आली आहे. आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घेऊन तातडीने ही कारवाई करण्यात येत असून, पुढील काळातही यात सातत्य सुरू राहणार आहे.' - राजेश आगळे, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# तळेगाव ढमढेरेत मादी बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद



पुणे । प्रतिनिधी

येथील जगताप वस्ती आणि चौधरी वस्ती परिसरात वारंवार बिबट्याचे दर्शन होऊन नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. तसेच, काही दिवसांपूर्वी पाळीव पशुधनावर हल्ल्यांच्या घटनाही घडल्या होत्या. या पार्श्वभूमीवर शिरूर वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात अखेर एक मादी बिबट्या जेरबंद करण्यात आली असून, त्यामुळे ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

वनविभागाच्या वतीने टाकळी भीमा रोडवरील जगताप वस्ती येथे शिवराज जगताप यांच्या शेतात बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा बसवण्यात आला होता. सोमवारी सकाळी शेजारील शेतकरी गजानन जगताप शेतात गेले असता, पिंजऱ्यात बिबट्या अडकल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तातडीने ही माहिती शिरूर वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांना दिली. माहिती मिळताच वनपरिमंडळ अधिकारी गौरी हिंगणे, नियतक्षेत्र वनअधिकारी प्रमोद पाटील, तसेच वन्यजीव बचाव पथकातील शेरखान शेख, वैभव निकाळजे, अमोल कुसाळकर आणि परमेश्वर दहीरे यांनी घटनास्थळी धाव घेतली. वैभव ढमढेरे, पोपट जगताप, अमोल ढमढेरे यांच्यासह ग्रामस्थांच्या उपस्थितीत बिबट्याला सुरक्षितपणे ताब्यात घेण्यात आले.

वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंजऱ्यात जेरबंद झालेला बिबट्या अंदाजे अडीच वर्षांचा मादी प्रवर्गातील आहे. तिची पुढील वैद्यकीय तपासणी करून तिला माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रात रवानगी करण्यात आली आहे.

तळेगाव ढमढेरे येथील ढमढेरे वस्ती, चौधरी वस्ती व जगताप वस्ती परिसरातून गेल्या एका वर्षात चार बिबटे जेरबंद करण्यात आले आहेत. तरीही परिसरात अजून बिबटे असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने, वनविभागाने तातडीने अधिक पिंजरे लावून सतत गस्त वाढवावी, अशी ठाम मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# मावळमधील जमीनीवर विनापरवाना उत्खनन

## हजारो झाडांची कत्तल; आमदार सुनील शेळकेंच्या नातेवाईकांवर गंभीर आरोप!



पुणे । प्रतिनिधी

राज्यात एकीकडे तपोवनातील वृक्षतोडीवरुन गदारोळ माजली असताना पुणे जिल्ह्याच्या मावळ तालुक्यातून आणखी एक नवीन प्रकरण समोर आलंय. आमदार सुनील शेळके यांच्या कुटुंबीयांच्या मालकीच्या वनीकरणासाठी आरक्षित असलेल्या जमिनीत विनापरवाना अनधिकृत उत्खनन करुन हजारो झाडांची कत्तल करण्यात आलेली आहे, असा थेट आरोप उद्योजक रणजित काकडे यांनी केलेला आहे. त्यामुळे आमदार सुनील शेळके यांच्यावर कारवाई करणार का ? असा सवाल देखील विचारला आहे.

नानोली, मावळ येथील जमिनी वनीकरणासाठी आरक्षित श्रेणीत येतात. या जमिनीमध्ये कोणतीही अधिकृत परवानगी न घेता उत्खनन करण्यात आल्याचा दावा रणजित काकडे यांनी केला आहे. या जमिनी आमदार सुनील शेळके यांच्या स्वतःच्या कुटुंबीयांच्या मालकीच्या असून तेथे अनधिकृत उत्खनन केलेले आहे. मावळ तालुक्यातील अवैध उत्खनन प्रकरण नुकतेच अधिवेशनात गाजले. आमदार सुनील शेळके यांनीच या विषयावर लक्षवेधी सूचना मांडली होती आणि त्यावर महसूल विभागाने ताबडतोब मोठी कारवाई केली आहे. ४ तहसीलदार आणि १० तहसील अधिकाऱ्यांचे निलंबन केले. याच पार्श्वभूमीवर आता त्याच आमदार सुनील शेळके यांच्यावर महसूल विभाग कारवाई करणार का? असा सवाल उपस्थित झाला आहे. या कथित उत्खनन प्रकरणावर प्रशासनाकडून कोणती भूमिका घेतली जाणार ? सखोल चौकशी होणार का ? कायदेशीर कारवाई होईल का ? असे अनेक सवाल उपस्थित होत आहेत.

संवैधानिक पदावरील विश्वासाचा गैरफायदा घेवून माननीय महसूल मंत्री बावनकुळे यांना आमदार महोदयांनी चुकीची माहिती दिली. त्यामुळे, आपल्या पदाचा गैरवापर केला म्हणून आमदार सुनिल शेळके राजीनामा देणार का? अशी विचारणा देखील रणजीत काकडे यांनी केली आहे. लोकप्रतिनिधीच्या कुटुंबीयांच्या संबंधित जमीन आणि त्यावर अनधिकृत उत्खनन हे प्रकरण महसूल विभागाने गांभीर्याने घेऊन सखोल चौकशी करून त्यावर त्वरित योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी काकडे यांनी केली आहे.

# शिरूर तहसील कार्यालयात बेमुदत महाधरणे आंदोलन



शिरूर । प्रतिनिधी

तहसीलदार कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय, भूमी अभिलेख उपअधीक्षक कार्यालय तसेच पोलीस प्रशासनाच्या माध्यमातून मागासवर्गीय, दलित व बहुजन समाजावर झालेल्या कथित अन्याय-अत्याचार व प्रलंबित प्रकरणांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवारी (ता. १५) शिरूर तहसीलदार कार्यालयाच्या आवारात बेमुदत महाधरणे आंदोलनास सुरुवात करण्यात आली आहे.

हे आंदोलन सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र लक्ष्मण आल्हाट यांच्या नेतृत्वाखाली लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सामाजिक संस्था व राष्ट्रीय स्मारक समिती यांच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. प्रशासनाकडून वारंवार दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत, न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला आहे. आंदोलनादरम्यान पीडित नागरिकांनी त्यांच्या तक्रारी लेखी स्वरूपात सादर कराव्यात, असे आवाहन आल्हाट यांनी केले आहे. प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी व प्रशासनाला जाब विचारून ठोस कारवाईसाठी दबाव टाकण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या आंदोलनातील प्रमुख मागण्यांमध्ये शिरूर येथील किसन सखाराम काकडे यांच्या मालमत्तेतील कथित हेराफेरीची सखोल चौकशी, बाळासाहेब खंडू जाधव यांच्या जमिनीबाबत झालेल्या चुकीच्या फाळणी व बारा नोंदी रद्द करून सातबारा दुरुस्ती, तसेच माजी सैनिक साहेबराव भागुजी जाधव यांना मिळालेल्या शासकीय जमिनीतील बेकायदा नोंदींची दप्तर तपासणी करून दोषींवर कडक कारवाई करण्याच्या मागण्या समाविष्ट आहेत.प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला आहे. या बेमुदत महाधरणे आंदोलनाला खंडू गंगणे, सतीश तागड, दादाभाऊ लोखंडे, नीलेश पवार, एजाज बागवान, दिपिका भालेराव, शहाजी जाधव, लालासाहेब वाघचौरे, सोमनाथ परदेशी, तसेच निळं वादळ सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा दिपिका भालेराव यांनी जाहीर पाठिंबा दर्शविला आहे.सामाजिक न्यायाच्या प्रश्नावर शासन व प्रशासनाला जागे करण्यासाठी सुरू झालेल्या या आंदोलनाकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले असून, पुढील घडामोडींवर सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

# शिरूर महसूल कर्मचारी सामूहिक रजेवर

शिरूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या महसूलमंत्र्यांनी १२ डिसेंबर २०२५ रोजी मावळ तालुक्यातील मुरुम उत्खनन प्रकरणी तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि ग्राम



महसूल अधिकाऱ्यांवर केलेल्या निलंबनाच्या कारवाईमुळे महसूल विभागात तीव्र असंतोष पसरला आहे. या अन्यायकारक कारवाईमुळे महाराष्ट्र राज्य ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी संघ, शाखा शिरूर येथील कर्मचाऱ्यांनी दि. १५ डिसेंबरपासून सामूहिक रजेवर जाण्याचा निर्णय घेतला आहे.

या संदर्भात संघटनेचे अध्यक्ष प्रकाश लोखंडे व उपाध्यक्ष गुल्फाम शेख यांनी नायब तहसीलदार प्रकाश मुसळे यांना लेखी पत्र दिले आहे. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी मांडल्यानंतर मावळ तालुक्यातील एका तहसीलदार, चार मंडळ अधिकारी व दोन ग्राम महसूल अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात आले होते. संबंधित प्रकरणात ठोस दोष सिद्ध न होता कारवाई करण्यात आल्याचा आरोप महसूल कर्मचारी संघटनांनी केला आहे.महसूल विभागावर ई-केवायसी, पीक विमा योजना, पीएम किसान, निवडणूक कामकाज यांसारख्या अनेक महत्त्वाच्या योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी आहे. या ताणाखाली काम करत असताना, नियमबाह्य उत्खननासारख्या संवेदनशील विषयांमध्ये थेट निलंबनाची कारवाई करणे अन्यायकारक असल्याची भावना कर्मचाऱ्यांमध्ये आहे. अनेक ठिकाणी पोलीस संरक्षणाशिवाय कारवाई करावी लागत असल्याने अडचणी निर्माण होत असल्याचेही पत्रात नमूद आहे.कर्मचारी रजेवर गेल्याने शिरूर महसूल विभागाचे कामकाज पूर्णपणे ठप्प झाले असून, नागरिकांच्या कामावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. निलंबित अधिकाऱ्यांची तात्काळ निलंबनमुक्ती करावी, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा विविध महसूल कर्मचारी संघटनांनी दिला आहे.

# तक्रार मागे घेण्यासाठी पीडितेलाच ठेवले डांबून

पिंपरी । प्रतिनिधी

कंपनीतील मानसिक त्रासातून न्याय मिळवून देण्याच्या बहाण्याने दोन महिला सामाजिक कार्यकर्त्यांनी एका पीडित महिलेकडून ७० हजार रुपये उकळले. त्यानंतर कंपनीच्या एचआर विरोधातील तक्रार मागे घेण्यासाठी दबावतंत्राचा वापर करत त्यांनी फिर्यादी महिलेस दोन दिवस डांबून ठेवले.

तसेच पीडित महिलेकडूनच आणखी एक लाख रुपयांची मागणी करून जीवे मारण्याची धमकी पुन्हा खंडणी उकळली दिली. ही घटना सप्टेंबर २०२४ ते २१ सप्टेंबर २०२५ या कालावधीत चाकण येथे घडली.या प्रकरणी एका ३८ वर्षीय महिलेने सोमवारी (दि. १५) चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चाकण येथील दोन महिला सामाजिक कार्यकर्त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिलेला त्यांच्या कंपनीतील एच. आर. हेडकडून झालेल्या मानसिक त्रासाबाबत न्याय मिळवून देण्याचे आमिष आरोपींनी दाखवले. त्यासाठी त्यांनी कंपनीच्या एच.आर. हेड विरोधात तक्रार अर्ज घेतला आणि कामासाठी पैसे लागतील असे सांगून सप्टेंबर २०२४ ते सप्टेंबर २०२५ या दरम्यान वेळोवेळी रोख ७० हजार रुपये घेतले. त्यानंतर, आरोपींनी एच.आर. हेडकडूनही प्रकरण मिटविण्याच्या नावाखाली पैसे घेतले. त्यानंतर फिर्यादीवर तक्रार अर्ज मागे घेण्यासाठी दबाव टाकला. दबावतंत्राचा भाग म्हणून १९ ते २१ सप्टेंबर २०२५ दरम्यान महिलेस एका आरोपी महिलेच्या घरात दोन दिवस डांबून ठेवण्यात आले. तसेच, त्यांनी पुन्हा पीडित महिलेकडेच एक लाख रुपयांची मागणी करत पैसे न दिल्यास 'कोठेतरी नेऊन टाकून देऊ' अशी धमकी दिली. या भीतीमुळे फिर्यादी आणि त्यांच्या पतीने २४ सप्टेंबर २०२५ रोजी दोन्ही महिला आरोपींना प्रत्येकी ३०-३० हजार रुपये दिले.

# ज्ञान ही भारतीय संस्कृतीचा आधार राज्यपाल आरिफ मोहम्मद खान



पुणे । प्रतिनिधी

**ज्ञान हा भारतीय संस्कृतीचा आधार असल्याने भारतीय संस्कृती निरंतर आहे आणि याचा अर्थ भौतिकता व विज्ञानाकडे दुर्लक्ष करणे असा होत नाही, असे प्रतिपादन बिहारचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी केले. एकात्मता ही भारतीय ज्ञान परंपरेचा मुख्य बिंदू आहे आणि विविधतेचा सन्मान करून स्वीकारणे महत्त्वाचे आहे. ज्ञानदृष्टी प्राप्त करण्यासाठी साहित्य महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी नमूद केले.**

राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे पुणे पुस्तक महोत्सवांतर्गत आयोजित पुणे लिट फेस्टचे उद्घाटन खान यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रीय पुस्तक न्यासचे अध्यक्ष प्रा. मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक, महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे, लोकमान्य मल्टिपर्पज को. ऑप. सोसायटीचे अध्यक्ष किरण ठाकूर उपस्थित होते.

खान यांनी ऋग्वेदाला युनेस्कोने सर्वात प्राचीन मानले असल्याचा उल्लेख करून, भारतीय संस्कृती ज्ञान आणि प्रज्ञेच्या संवर्धनाची संस्कृती असल्याचे सांगितले. अरबांनी भारतीय साहित्याचा पहिल्यांदा अनुवाद केला आणि युरोपच्या अवकाश अभ्यासाचा आधार असलेला 'सूर्य सिद्धांत' हा ग्रंथ अरबीतून युरोपात गेल्याचे त्यांनी सांगितले. अरबीमध्ये 'हिंद' या शब्दाचा अर्थ 'सुंदर' असा होतो आणि ही सुंदरता ज्ञानाची आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.प्रा. मिलिंद मराठे म्हणाले की, पुन्हा पुन्हा वाचले जाते ते अभिजात साहित्य असते, ज्यात ज्ञान, मनोरंजन आणि समाजाला दिशा देण्याची ताकद असते. राजेश पांडे यांनी सांगितले की, तरुण वाचतात हे या महोत्सवाने सिद्ध केले असून, 'वाचा, ऐका आणि भारत समजून घ्या' ही या महोत्सवाची संकल्पना आहे.

# वाघोलीत कोयत्याची दहशत; गाडी-सीसीटीव्हीची तोडफोड, नागरिकांकडून कडक कारवाईची मागणी

वाघोली । प्रतिनिधी

वाघोली येथे पहाटे एकच्या सुमारास चार ते पाच तरुणांनी कोयत्याची दहशत करून वाघोली मधील एका गाडीचे व सीसीटीव्हीचे नुकसान केल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू असून नागरिकांनी कोयत्याची दहशत पसरवणाऱ्या युवकांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.



वाघोलीमध्ये कोयत्याद्वारे पाच ते सहा युवकांनी दहशत करण्याचा प्रकार केला असल्याचे सीसीटीव्ही फुटेजद्वारे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी पोलिसांनी संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. याबाबत शिवसेनेचे युवासेना जिल्हाप्रमुख गणेश सातव यांनी सांगितले की, वाघोलीमध्ये पहाटेच्या सुमारास पाच ते सहा युवकांनी कोयता फिरवत दहशत पसरवण्याचा प्रकार केला असून वाघोली पोलिसांनी तात्काळ या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन कायदेशीर कारवाई करावी.

वाघोली परिसरामध्ये गुटखा व गांजा मोठ्या प्रमाणात पकडण्यात येत आहे. अशा कारवाईमधून पोलीस आपली चांगली ओळख निर्माण करत आहेत. मात्र सर्वसामान्य नागरिक दहशतीखाली असताना दहशत निर्माण करणाऱ्या गुन्हेगारांची मिरवणूक काढून का कारवाई करत नाही, असा सवाल उपस्थित होत आहे.

वाघोलीत पोलीस चौक्या उभारण्याची गरज -

वाघोली पोलीस ठाणे अंतर्गत वाघोलीची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून वाढत्या लोकसंख्येचा विचार करून पोलीस अधिकारी व कर्मचारी देऊन वाघोली परिसरात सध्या केसनंद एकमेव चौकी कार्यान्वित आहे. इतर भागात आवळवाडी मांजरी परिसर यासाठी तसेच वाघेश्वर मंदिर परिसरासाठी पोलीस चौक्यांची उभारणी करून अधिकाऱ्यांची नेमणूक करून कामकाज केल्याने गुन्हेगारांवर वचक व नागरिकांना तातडीने मदत मिळण्यास उपयोग होईल, अशी भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# पुणे पुस्तक महोत्सवात रश्मी पदवाड मदनकर लिखित 'कायांतर' कादंबरीचे प्रकाशन



पुणे । प्रतिनिधी

**पुण्यात सुरू असलेल्या पुस्तक महोत्सवात रविवार (दि. १४ डिसेंबर २०२५) रोजी कवयित्री व लेखिका रश्मी पदवाड मदनकर यांच्या 'कायांतर' या कादंबरीचे औपचारिक प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. साहित्य, पत्रकारिता व संशोधन क्षेत्रातील नामवंत व्यक्तींच्या हस्ते झालेल्या या प्रकाशन सोहळ्याने महोत्सवात विशेष लक्ष वेधून घेतले.**

या कार्यक्रमाला मराठी विभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, ज्येष्ठ लेखक, वरिष्ठ पत्रकार व संपादक अरूण खोरे, प्रसिद्ध मराठी लेखक, कवी, नाटककार, समीक्षक, इतिहास संशोधक, प्रवचनकार व कीर्तनकार सदानंद मोरे, प्राध्यापक व लेखक प्रकाश पवार तसेच पद्मगंधा प्रकाशनचे संचालक आणि 'कायांतर' कादंबरीचे प्रकाशक अभिषेक जाखडे उपस्थित होते. या सर्व मान्यवरांच्या हस्ते 'कायांतर' कादंबरीचे औपचारिक प्रकाशन करण्यात आले.

तृतीय पंथी व्यक्तीच्या जीवनप्रवासावर भाष्य करणारी ही कादंबरी खूप काही सांगणारी आहे. लेखिका रश्मी पदवाड मदनकर यांनी आंचल वर्मा या तृतीय पंथी व्यक्तीच्या आयुष्यावर आधारित 'कायांतर' ही कादंबरी लिहिली आहे. समाजाच्या काठावर ढकलल्या गेलेल्या एका संवेदनशील व्यक्तिमत्त्वाचा संघर्ष, आत्मशोध आणि परिवर्तनाचा प्रवास या कादंबरीत प्रभावीपणे उलगडण्यात आला आहे.

यावेळी बोलताना मान्यवर वक्त्यांनी अत्यंत संवेदनशील विषयावरची ही कादंबरी केवळ कथनापुरती मर्यादित न राहता समाजाशी संवाद साधणारी असल्याचे नमूद केले. तृतीय पंथीयांच्या भावविश्वाला शब्दरूप देणारी ही कादंबरी 'अत्यंत बोलकी' असून वाचकांना अंतर्मुख करणारी ठरेल, अशी भावना वक्त्यांनी व्यक्त केली. लेखिकेची संवेदनशील मांडणी, आशयघनता आणि भाषेवरील पकड यांचे विशेष कौतुक यावेळी करण्यात आले.साहित्यप्रेमी, वाचक आणि अभ्यासकांची मोठी उपस्थिती या प्रकाशन सोहळ्यास लाभली. पुणे पुस्तक महोत्सवातील हा कार्यक्रम समकालीन मराठी साहित्याला सामाजिक जाणिवेची नवी दिशा देणारा ठरला.

cmyk